# दोन प्रास्ताविक शब्द

वैकुंठवासी टिळक यांचे चरित्रासंबंधीं कांहीं नव्या गोष्टी
...च्या हातून वाचकांपुढें मांडल्या जाणार नाहींत हें आम्हीं
...ून आहों. टिळकांचें चरित्र पुष्कळ लिहितील; कांहीं
...त आहेतहि. टिळकां सारख्या थोर पुरुषाचें समग्र चरित्र
...ांपुढें मांडण्याचें काम अत्यंत अवघड असून तें श्री. नरसिंह
...मण केळकर यांच्यासारख्या लोकमान्यांच्या तालमींत कस-
...ाळ्या विद्वानांचेच हातून होणार आहे. ही गोष्ट जर खरी
...आम्हीं हा खटाटोप कां करावा हा सहज प्रश्न उद्भवतो.
...तर आमचे मतें असें आहे कीं आम्ही हें जें अत्यंत लहान
...ाचकवर्गापुढें लोकमान्यांची आठवण म्हणून ठेव-
...आहों त्यांत त्यांचे अल्प चरित्र, त्यांचे निधनानंतर निर-
...ा वर्तमानपत्रकारांनीं व इतर सद्गृहस्थांनीं त्यांच्याविषयीं
... प्रशंसापर उद्गार हे एकत्र पुस्तकरूपानें रहावे व थोडक्या
...र्व चरित्र डोळ्यासमोर येऊन खेड्यापाड्यांतून त्याचा
...व्हावा व विशेषतः अशिक्षितवर्गास बोध व्हावा या हेतूनें
... लिहीत आहों. लोकमान्यांचा व आमचा संबंध फार
अवघ्या तेरा वर्षांचाच होता. एवढ्या काळांत त्यांचे
...ण्याचा योग ज्या ज्या वेळीं आला त्या वेळेचा अनुभव,
... व सार्वजनिक व्यवहारांतील वर्तन पाहून त्यांचें
आत्मविश्वास व लोककार्यतत्परता फार ...
...ाद देणारी अशी होती त्यांच्या विषयीं ...

प्रेम, पूज्यभाव व आदर हीं लिहून व्यक्त करणें जरी शक्य
तरी अंतःकरणाची मळमळ राहत नसल्याकारणानें हें पु
लिहिणें आम्हांस भाग पडत आहे.

अलीकडे जिकडे तिकडे मोफत बाचनालयांचा फैलाव फ
झपाट्यानें होत असल्याकारणानें सरस्वतीमंदिरामध्यें वाचक
वर्गास रसभरित, मनोवेधक व आलंकारिक भाषारूपीं षड्रसगुणांनी
भरलेलीं पक्वान्नें यथेच्छ मिळत असल्याकारणानें आमच्या पडक्या
झडक्या झोंपडींत चटणीभाकर यांशिवाय कांहीं एक चाखा
यास मिळणार नाहीं तरी लोकमान्यांची मूर्ती नखशिखांत
अंतःकरणांत सांठवून मी आपले विचार जनतेपुढें मांडीत
असल्यामुळें त्यांचा वाचक प्रेमानें स्वीकार करतील अशी
प्रगट करून ही प्रस्तावना पुरी करितों.

पुणें,
ता. २० जुलै १९२१

कृष्णाजी मोरेश्वर फाटक

# टिळक-जन्म-रहस्य.

ाजपर्यंतचा जगाचा इतिहास पाहिला असतां नित्य नव्या
ऱ्या घडामोडी व असंख्य प्राण्यांच्या जननमरणाची नोंद
अशक्य आहे. तथापि प्रत्येक नियमास अपवाद हा असा-
ांच. परमेश्वराच्या योजनेंत अशी कांहीं जादू आहे कीं,
गोष्टी कधीं कधीं अनवश्यक वाटतात त्या अत्यंत उपयुक्त
हत्वाच्या असतात. जन्मास येणाऱ्या प्राण्यामध्यें परमेश्वरास
क जाणणारा असा एक मनुष्य प्राणीच आहे. हिंदुस्थानांतील
ण्यांत कोट्यावधि माणसें आज हयात आहेत व यापूर्वीं
आले व गेले. "जन्मा आला हेला व पाणी वाहून मेला"
ाणीप्रमाणें बहुतेकांच्या जीवनक्रमाचा निकाल लागलेला
ऱ्या नजरेस येईल. आपल्या जन्माचें सार्थक करण्यांत, आपला
व इतरांचा जीव यांचें तादात्म्य झालेलें, लोककल्याणार्थ
ीं आपला देह आमरणांत चंदनाप्रमाणें झिजविला अशीं
ें अल्पम दुनियेंत हाताच्या बोटावर मोजण्याइतकीं सांपडतील
हीं याची शंका आहे. तरी देखील भगवंतांनीं श्रीमद्भगवद्-
ाश्वासन दिल्याप्रमाणें "परित्राणाय साधूनां विनाशाय च
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥" 'जेव्हां जेव्हां
ना छळ होईल, जनता त्रस्त होईल, अधर्म माजेल,
मी अवतार घेत जाईन.' हिंदुस्थान देशाची आज-
दशा होत आहे, इंग्रजी अंमलांतील नित्यशः होणारे
ारचे जुलूम, लोकांची गाढ निद्रावस्था, अशा भयंक

परिस्थितींत हिंदुस्थान नामशेष होतो कीं काय याची
वाटूनच कीं काय शिवाजी महाराजांचे मागें सर्वत्र पस
अंधार दूर करण्यासाठीं परमेश्वरानें महाराष्ट्रीयांच्या आधारास
अवतारी पुरुष निर्माण केला.

तो काळच अत्यंत आणीबाणीचा होता. "असा लोकनाय
राजकारणधुरंधर, नरश्रेष्ठ, राष्ट्रसूत्रधार लोकमान्यांसारखा नेत
पुरुष बुडणाऱ्या नौकेस नावाडी प्राप्त झाला, हें महाराष्ट्रीयांचें केव
भाग्य. धन्य ती रत्नागिरी, धन्य ती मातापितरें, कीं ज्यांचे पो
असा कोहिनूर जगाचा उद्धार करणारा अवतारी पुरुष निपजल
ज्यानें जन्मापासून मरेपर्यंत अखंड लोकजागृति केली, आपल्य
बांधवांस जिवंतपणाची जाणीव करून दिली, व पारतंत्र्यांत पर
अमलाखालीं सडून जाणाऱ्या महाराष्ट्रास अमृत पाजून
केलें ! टिळकांचा अवतार जर झाला नसता तर आज जी ना
शाही थोडीशी हातपाय आंखडून बसलेली आहे तिनें ज
अगदीं त्राही भगवान् करून सोडलें असतें. टिळकांचा जन्म
महाराष्ट्राचें जीवन. शरीराचा एक भाग तुटून पडावा व
वेदना सर्व शरीरास होऊन प्राण व्याकुळ होतात त्याप्रमाणें
मान्यांनीं आपला व लोकांचा जीव हे एकरूप केले असल्यान
त्यांच्या निधनानें महाराष्ट्रांतील सर्व लोकांचें शरीर लुलें
आहे. त्यांतील चमकणारा विजेचा प्रवाह एकदम बंद पडू
व हा चाळीस वर्षेपर्यंत रेटींत आणलेला राजकीय च
गाडा येथेंच थंडावतो कीं काय अशी भीति वाटूं लागल
रंतु असे हताश होऊन स्तब्ध बसणें, कर्तव्यहीन होणें,
यांची शिकवण नव्हती. सुखदःखाचीं किंचित

करितां केवळ लोकोपकारार्थ अखंड निःस्वार्थ बुद्धीनें कार्य करणें हेंच त्यांच्या जीवितांचें सार व याचाच स्वीकार त्यांचे अनुयायांनीं केला पाहिजे तरच ते टिळकांचे भक्त व खरे महाराष्ट्रीय. लोकमान्य ह्यात असतां लोकांनीं त्यांचा जयजयकार केला, टाळ्या वाजवून हारतुरे घातले, मिरवणुकी काढल्या, त्यांचे गुणानुवाद गाइले, व त्यांच्या मृत्यूनंतर घरोघर रडत स्वस्थ बसले तर ही कर्तव्यपराङ्मुखता झाली. टिळकांनीं केलेल्या उपकारांची अंशतः तरी फेड करावयाची असेल तर त्यांनीं आंखून दिलेल्या मार्गानें महाराष्ट्रानें गेलें पाहिजे. महाराष्ट्राचे क्षात्रवृत्तीचा लोप झाला व महाराष्ट्र एखाद्या मेंढपाळामागें मेंढराप्रमाणें आपलें स्वत्व विसरून जाऊं लागला कीं महाराष्ट्र ठार बुडाला म्हणून समजावें. श्रीशिवाजी महाराज, रामदासस्वामी व राष्ट्रसूत्रधार गुरुवर्य टिळक यांनीं घालून दिलेला मार्ग तोच महाराष्ट्रीयांचा राजमार्ग व तोच महाराष्ट्रास स्वराज्याकडे त्वरित नेईल. हें महाराष्ट्रीयांनीं विसरतां कामा नये !

मनुष्यप्राणी जन्मास आला म्हणजे त्याचे आप्तेष्टांस मोठा आनंद वाटतो. वयोमानाबरोबर तो आपले व्यावहारिक बंधनांत जसजसा जास्त जास्त संचार करितो तसतसा त्याचा स्नेहसंबंध अधिकाधिक वाढत जाऊन त्याचे जगांतील ज्या ज्या माणसाशीं व्यवहार पडतात, त्या त्या प्रमाणानें कमजास्त मायापाश बळावत जातात. प्रेमसंबंधाचे परस्परांमधील धागे अधिकाधिक दृढ होतात; परंतु या सर्वांस सृष्टिनियमांप्रमाणें शेवट हा असावयाचा. बाल्यावस्था, तारुण्य, वृद्धावस्था व नाश ही यच्चयावत् प्राण्यांना सोडीत नाहींत. अखेरीस तो प्राणी शेवटच्या नाशाचे पायरीवर आला म्हणजे त्याचे अगर

त्याचे आप्तइष्ट, गणगोत, स्नेही यांचे इच्छेविरुद्ध तो एकाए निघून गेला म्हणजे त्याचे जननप्रसंगीं जितके लोक आनं मानणारे असतात त्यापेक्षां मृत्युसमय आल्यावर त्या दुःखं प्रसंगाचा वांटेकरी मोठा समुदाय असतो. त्या वेळीं त्याचे जन्मा-पासून मरेपर्यंतच्या सद्गुणांची आठवण करून शोक करण्याचा प्रघात पडलेला आपण पहातों. जन्मापासून मरेपर्यंत आनंददायी प्रसंग म्हणजे त्याचा वाढदिवस पाळणें प्रसंगविशेषीं त्याचे गुणानुवाद गाणें हा होय. या वेळीं तो प्राणी स्वतः हजर असतो; परंतु तो इहलोक सोडून गेला म्हणजे त्याची मृततिथि अगर पुण्यतिथि पाळण्यांत येते हा दुःखाचा प्रसंग असतो. मृततिथि पाळण्याचे वेळीं तो स्वतः हजर नसला तरी त्याची मूर्ती लोकांचे डोळ्यासमोर व अंतःकरणांत स्थिर अशी उभी असते. त्याच्या सत्क्रिया व परोपकार लोकांचे ज्ञानचक्षूपुढें वावरत असतात व तुम्ही आपलें कर्तव्य करा असें त्यांस बजावीत असतात. मृताचा दिवस पाळणें हें केवळ त्याचे आत्म्यास शांति मिळावी म्हणूनच नव्हे, त्यास स्वर्गांत सुखप्राप्ति व्हावी म्हणून नव्हे, कारण हा पारलौकिक धर्मकृत्याचा भाग झाला. तो त्याचे नातलग करीतच असतात. परंतु त्याचे अनुयायी, स्नेहसंबंधी, सहचारी लोकांवर दुसऱ्याच एका महत्वाच्या कामगिरीची जबाबदारी पडते. व्यावहारिक दृष्टीनें पाहतां त्याची मृततिथि पाळणें, श्राद्धपक्षादि धर्मसंस्कार करणें हे त्याचे सत्पुत्र करीत असतात. हें आकुंचित दृष्टीचें पाहणें झालें; हें एका ठराविक मर्यादेंतील संसारी पुरुषाचें लक्षण झालें. परंतु ज्यानें सर्व जग हा आपला संसार समजून जन्मापासून आपला देह लोकांस समर्पण केला व जगाशीं एकरूपता दाखविली अशा परा-

क्रमशाली थोर विभूतीची गोष्ट निराळी. अशा विभूतीचे मार्गे राहिलेल्या अनुयायांनीं त्यांनीं घालून दिलेला धडा गिरवून आमरणांत आपलें व्रत न सोडणें हेंच त्यांचें खरें कर्तव्य होय. आपल्या वियोगानें आखिल भरतखंडास तळमळ लावून निघून गेलेले धैर्यवान् पुरुष लो० बळवंतराव टिळक होत ! सर्व महाराष्ट्र-सर्व हिंदुस्थान-हा त्यांनीं आपला संसार करून सोडला होता. त्यांचा जन्म स्वातंत्र्यवादी घराण्यांतील उच्च कुळांत झालेला होता. टिळक हे केवळ रत्नागिरी जिल्ह्यांतील एका लहानशा चिखलगांवीं जन्मास आलेले कोंकणस्थ ब्राह्मण नसून ते हिंदुस्थानांत गुलामगिरीच्या शृंखलांनीं जखडलेल्या प्रत्येक हिंदी गृहस्थाचे नातलग व पाठीराखे होते. टिळकांच्या चौसष्ट वर्षांच्या आयुष्यांतील ठळक ठळक गोष्टींची चटकदार भाषेंत लिहून ठेवलेलीं वर्णनें वाचून अगर त्यांच्या चरित्राची शिवलीलामृत, भक्तिविजय, गुरुचरित्र अगर ज्ञानेश्वरी प्रमाणें पारायणें करून त्यांच्या मृतात्म्यास समाधान वाटणार नाहीं. हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं त्यांनीं जी अहोरात्र खटपट केली, नोकरशाहीच्या माकडचेष्टांस न जुमानतां तुरुंगांतील कष्टमय प्रसंगाचा मनावर बिलकुल परिणाम होऊं न देतां जे हाल सोसले त्याहिपेक्षां अधिक खडतर प्रसंग ओढवले. कुटुंबेच्या कुटुंबें खर्चीं घालावी लागलीं तरी अंगीकृत कार्य पुरें करण्याचा दृढ संकल्प न सोडतां आपलें ध्येय साधण्यांत अहर्निश झटणारी स्वतंत्र बाण्याची तरुण पिढी त्यांचे अंगीकृत कार्य तडीस नेईल तरच त्यांचे आत्म्यास खरी शांति मिळणार आहे. टिळकांचे प्रतिसांवत्सरिक श्राद्ध करून आपणामधील राष्ट्रीय भावनांचा कितपत विकास झाला आहे, स्वराज्यास पोंचण्याच

मार्ग किती आक्रमण करावयाचा राहिला आहे याचा दर वर्षी आढावा काढून टिळकांचे पुण्यस्मरणाचे दिवशीं या सर्व गोष्टींचा ऊहापोह झाला पाहिजे. टिळकांच्या आंगच्या गुणांचें वर्णन जेवढें करावें तेवढें थोडेंच. त्यांच्या लोकोत्तर कामगिरीचें विवेचन विस्तृतपणें करूं लागल्यास विश्वकोशाएवढे ग्रंथहि पुरे पडणार नाहींत; व तें काम अत्यंत जबाबदारीचें व अवकाशानें व्हावयाचें असून तें पुरें करणारीं रा. तात्यासाहेब केळकरांसारखीं थोर माणसें आहेत तीं करतीलच. परंतु केवळ स्मरणादाखल म्हणून टिळकांचें अल्पचरित्र, त्यांतील ठळक गोष्टींची माहिती व त्यांचे निधनानंतर त्यांचे स्नेही, प्रतिस्पर्धी व वर्तमानपत्रकार यांनीं काढलेले उद्गार हे संग्रहणीय वाटल्यावरून त्यांचे उतारे देऊन व कांहीं हृदयस्पर्शी कविता देऊन सदरहू छोटेखानी पुस्तक पुरें करण्याचा आमचा विचार आहे.

## कुल व जन्म.

टिळकांचा जन्म सन १८५६ सालीं जुलै महिन्याच्या २३ तारखेस झाला. त्यांची जन्मभूमि रत्नागिरी शहर होय. त्यांचें मूळगांव दापोली तालुक्यांत चिखलगांव म्हणून आहे. गणित व संस्कृत या दोन विषयांत त्यांनीं विशेष प्राविण्य मिळविलें होतें. त्यांचे वडील गंगाधरपंत हे शिक्षक असून ते वैय्याकरणी असल्यामुळें त्यांस शास्त्री म्हणत असत. आपल्या वयाचे दहाव्या वर्षी टिळक पुण्यास आले व पुढें त्यांचा सर्व जन्म पुण्यासच गेला. वयाच्या १६ व्या वर्षी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होऊन १८७३ सालीं टिळक डेक्कन कॉलेजांत गेले. टिळकांची शरीरसंपत्ति उत्कृष्ट असून ते पोहोण्याच्या कलेंतहि चांगले निष्णात

होते. बी. ए. झाल्यानंतर एम्. ए. कडे न वळतां त्यांनीं एल्. एल्. बी. चा अभ्यास सुरू करून ती परिक्षा पास झाली तरी त्यांच्या मनाचा कल वकिली करण्याकडे बिलकुल नव्हता. पौर्वात्य विषयांचें ज्ञान प्राप्त करून घेऊन कोणत्याहि विषयांत संशोधन करून नवीन ग्रंथ लिहिण्याकडे त्यांची मनःप्रवृत्ति विशेषेंकरून असे. त्यांच्या दुर्दैवानें त्यांचे वडील त्यांच्या वयाच्या १६ व्या वर्षीं वारले. तथापि या संकटांस न डगमगतां सन १८७९ पर्यंत म्हणजे एल्. एल्. बी ची परीक्षा पास होईपर्यंत त्यांनीं आपला शिक्षणक्रम पूर्ववत चालू ठेवला. एल. एल. बी चे क्लासांत असल्यावेळेपासून कै. आगरकर व टिळक यांचा स्नेह जमला व सार्वजनिक कामांत पडावयाचें अगर वडलांप्रमाणें सरकारी नोकरींतच आपलें पुढील आयुष्य घालवावयाचें याचा विचार टिळकांचे मनांत सुरू झाला.

## धंद्याची निवड.

टिळक व त्यांचे कालेजांतील स्नेही यांच्यामध्यें कोणत्या धंद्यांत पडावयाचें याची बरीच वाटाघाट होऊन अखेरीस सर्वांच्या विचारानें एखादी खाजगी शाळा आणि कॉलेज काढावयाचें ठरून सर्वांनीं त्याच कार्याकडे आपला पुढील आयुष्याचा भाग खर्च करण्याचें नक्की केलें. याच सुमारास कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे आपली सरकारी नोकरी सोडून पुण्यास येऊन राहिले. स्वतंत्र इंग्रजी शाळा काढण्याचा त्यांचाहि विचार असल्यामुळें व टिळक आगरकर वगैरे गृहस्थांच्या मदतीनें सर्वांनीं मिळून ता. २ जानेवारी १८८० रोजीं मोरोबादादा फडणवीस यांचे वाड्यांत न्यू इंग्लिशस्कूलची स्थापना केली, तें अद्याप त्याचे वाड्यांत चालू आहे. टिळकांचे आप्त व स्नेही यांना टिळकाचें हें सर्व मनोराज्य

वाटून या फंदांत त्यांनीं पडूं नये म्हणून उपदेश चालविला; परंतु त्यांचे करारी स्वभावापुढें कोणाचें कांहीं चाललें नाहीं. शाळेचें काम व्यवस्थित रीतीनें चालून पुढें ती लौकरच लोकप्रिय झाली. लोकसेवा करण्याचें अधिक उपयुक्त साधन छापखाना व वर्तमानपत्र हें असून कोणत्यांही उदयोन्मुख राष्ट्राच्या बाळपणच्या चळवळींत छापखाने, लेखनकला व वक्तृत्व यांचीच आवड विशेष दिसून येते. डोक्यांत नुसती कल्पना असून हाताशीं लिहिण्याचें साधन नसल्यास आपले विचार लोकांपुढें मांडून ते त्यांच्या अंतःकरणांत बिंबविण्यास अत्यंत प्रयास पडतात. परंतु जवळ छापखाने, वर्तमानपत्रे यांसारखीं साधनें असल्यास ओठ आपोआप हलूं लागतात, बोटें लिहूं लागतात व तेलाच्या बिंदूप्रमाणें आपले विचार आटोक्यांतील सर्व मनुष्यमात्रावर पसरतात. या इच्छेनें संघटित प्रयत्न करण्याकरितां केसरी व मराठा हीं दोन पत्रें काढण्याचे ठरवून तीं सन १८८१ पासून सुरू करण्यांत आलीं. पुढें हीं दोन्ही पत्रें चांगल्या नांवारूपास व भरभराटीस आलीं तीं अद्याप चालू आहेत.

## कोल्हापूर प्रकरण.

टिळकांचे सार्वजनिक आयुष्यांतील प्रथमची उलथापालथीची अगर क्रांतीची गोष्ट म्हणजे ते व त्यांचे स्नेही आगरकर यांस झालेली चार महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा ही होय. सन १८८२ सालीं कोल्हापूर प्रकरणाच्या वेळीं टिळकांचें वय अवघें २६ वर्षांचें होतें. या वेळीं त्यांनीं दाखविलेलें धैर्य, करारीपणा व स्वार्थत्याग वाखाणण्यासारखा होता. या शिक्षेच्या योगानें त्यांची कोणत्याहि प्रकारें मानहानि न होतां उलट त्यांचा नांवलौकिक वाढून त्यांचें अंगीकृत लोककार्य अधिकच नेटानें सुरू झालें.

## क्राफर्ड प्रकरण.

टिळकांच्या राजकीय क्षेत्रांतील जीवनवृत्तांतास हळुहळू बरेंच तेज येऊं लागलें. १८८८–८९ साली त्यांनीं क्राफर्ड प्रकरणांत जी कामगिरी केली तिनें त्यांच्या आंगचें धैर्य, देशभक्ति व कर्तृत्व-शक्ति अधिक स्पष्टपणें लोकांच्या नजरेला आली. क्राफर्ड–मामलेदार प्रकरणांत मुख्यतः साहेब दोषी असतां ते इंग्रजी न्याय-देवतेच्या ठराविक पद्धतीला अनुसरून शिक्षेवांचून सुटले व बिचारे मामलेदार बडतर्फ झाले. हा अन्याय सहन न होऊन त्यांनीं इष्ट ती चळवळ करून मामलेदारांची दाद पार्लमेंटपर्यंत लावून मुंबई सरकाराकडून " मामलेदार्स इंडेम्निटी " ॲक्ट पास करून घेतला.

## संमतिबिलाची चळवळ.

१८९१ सालीं संमतिबिलाचे वेळीं त्यांनीं डॉ० भांडारकर प्रभृति पंडितांशीं वाद केला. ' संमतीचें बिल ' तात्विक व नैतिक दृष्टया टिळकांस पसंत होतें. परंतु त्यांचें म्हणणें इतकेंच होतें कीं लोकांच्या सामाजिक व धार्मिक बाबीमध्यें परकीय सरकारनें जुलमी कायदा करून लोकांवर लादणें हें बरोबर नाहीं. ते व सुधारक यांच्यांतील हाच मुख्य वादाचा मुद्दा होता. कोणतीहि सुधारणा इष्ट असली तरी शक्य तितकी ती लोकमतानेंच घडवून आणली पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें याच सुमारास टिळकांनीं पुण्यांत लॉ. क्लास सुरू केला.

## ओरायन.

वर नमूद केल्याप्रमाणें टिळकांनीं वकिलीसाठीं जरी लॉ. क्लास काढला तरी त्यांच्या बुद्धीचा कल निसर्गतः वाङ्मय व नवीन शोध लावणें यांकडेसच विशेष होता. परंतु परिस्थिति

अशी विलक्षण उत्पन्न झाली कीं, त्यांच्या सारख्या कडक स्वभावाच्या माणसास राजनीतिशास्त्राचेंच चक्रांत पडावें लागलें. लहानपणापासून भगवद्गीता व वेद यांची त्यांना फार गोडी वाटत असल्यामुळें त्यांचा अभ्यास त्यांनीं मोठ्या उत्साहानें, चिकित्सेनें व झटून चालविला. वेदांचा कालनिर्णय ठरवितांना चौकस बुद्धीनें विचार करून वेदांचे प्राचीनत्व सिद्ध करणारा असा त्यांनीं एक ग्रंथ लिहून तो सन १८९२ सालीं लंडन येथें भरलेल्या इंटरनॅशनल कांग्रेस कडे पाठविला, व तो पुस्तकरूपानें सन १८९३ मध्यें 'ओरायन' या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आला. ह्या ग्रंथाबद्दल टिळकांसंबंधीं सर्व अमेरिकन तत्ववेत्त्यांकडून प्रशंसापर उद्गार काढण्यांत आले व मॅक्समुल्लर साहेबांनींहि त्यांचा फार गौरव व वाखाणणी केली.

## गणपतिउत्सव व हिंदू मुसलमानांतील दंगे.

मुंबई प्रांतांत राज्यक्रांतिकारक चळवळ सुरू होण्यास सरकारकडून दोन कारणें दाखविण्यांत येतात. एक गणपतिउत्सव व दुसरा शिवाजीउत्सव. १८९३ सालीं मुंबईमध्यें हिंदू मुसलमानांमध्यें झालेल्या दंग्यामुळें मुसलमानांस चिडविण्यासाठीं म्हणून मुद्दाम सार्वजनिक गणपतिउत्सव सुरू करण्यांत आला असें सरकारकडून भासविण्यांत आलें. हिंदू मुसलमानांमधील तंटे विकोपास गेले. याचा सर्व दोष वास्तविक सरकारी अधिकाऱ्यांकडेसच होता व त्यांच्या चिथावणीमुळें मुसलमान लोक दुराग्रह धरीत. केवळ मुसलमानांचीं मनें बिथरतील म्हणून हिंदूंनीं सभा भरवूं नये असें म्हणणें चूकीचें आहे, असें टिळकांचें मत होतें. अखेरीस टिळकांचेंच म्हणणें बरोबर होतें हें मुसलमान पुढाऱ्यांनीं कबूल केलें.

## शिवाजी उत्सव.

शतकेच्या शतकें गाढ निद्रा वस्थेंत घोरत पडून एखाद्या उदयोन्मुख राष्ट्राला पुन्हां जागृतीचें स्फुरण चढतें व अंगांत एक प्रकारचा आवेश उत्पन्न होउन शिरशिरी भरते, अशा वेळीं राष्ट्रांतील शूरवीर मर्द माणसांच्या व कर्तृत्ववान धाडशी पुरुषांच्या चरित्राचें अवलोकन व मनन करणें किती अवश्यक आहे. याची त्यांनीं आपल्या मनाशीं पूर्ण ओळख पटवून घेतली व महाराष्ट्रांतील लोकांच्या आंगचा उत्साह अधिक वाढेल या हेतूनें त्यांनीं सन १८९५ सालीं शिवराज्याभिषेकोत्सव सुरूं केला. केसरींतील त्यांच्या लेखामुळें इतका विलक्षण परिणाम झाला कीं रायगड किल्ल्यावरील शिवाजी महाराजांचे छत्रीचे जीर्णोद्धारासाठीं वीस हजार रुपयांची रक्कम जमली.

## दुष्काळ व प्लेग.

१८९६।९७ सालीं महाराष्ट्रांतील लोक दुष्काळ व प्लेगानें अतिशय होरपळून गेले. शहाण्णव सालचा दुष्काळ अत्यंत जाचक झाला. लोकांच्या मदतीस संकटकाळीं धाऊन जाणें हा जो टिळकांचे आयुष्यांतील विशेष त्याबरहुकूम त्यांनीं पुण्यामध्यें स्वस्त धान्याचीं दुकानें काढविलीं. प्लेगाच्या सांथीनें पुणें शहरांत जेव्हां भडका उडवून दिला तेव्हां गरिब व निराश्रित लोकांस मदत म्हणून त्यांनीं एक हिंदूहॉस्पिटल काढलें. सांथीचे रोगास न भितां स्वयंसेवकामध्यें स्वतः हिंडून प्लेगनें लागलेल्या लोकांजवळ राहून त्यांची शुश्रूषा करण्यास ते डगमगले नाहींत. ता. २२ जून १८९७ रोजीं प्लेगमध्यें लोकांवर जुलूम करणारे दोन युरोपियन अधिकारी रँड व ले. आयर्स्ट यांचा कोण्या दुष्ट माथे-

फिरूनें खून केला. टिळकांची लोकसेवा नेहमीं विकृत करून दाखविण्याची सरकारास खोड होती. त्याप्रमाणें या खुनाची जबाबदारी त्यांनीं टिळकांवर लादण्याचा प्रयत्न केला. पण अखेर पोलिसखात्याकडूनच त्याचें परस्पर निराकरण झालें. तरी टिळकांना पकडण्यांत येऊन त्यांजवर खटला करण्यांत आला व त्यांना एक वर्ष नाहक तुरुंगवास भोगावा लागला. अखेर प्रो. मॅक्समूलर साहेब व वुइल्यम हंटर साहेब यांनीं महाराणी व्हिक्टोरिआ यांचेकडे टिळकांच्या गाढ विद्वत्तेकडे लक्ष देऊन दया दाखविण्याबद्दल मध्यस्थी केली व टिळकांची सुटका झाली. हिंदुस्थानांत राजद्रोहाचा महत्वाचा असा हा पहिलाच खटला होय. त्यानें टिळकांबद्दल सर्व हिंदुस्थानभर सहानुभूति उत्पन्न केली. त्यांच्यासाठीं परभारें फंड जमा झाले. कलकत्त्याहून बॅरिस्टर रवाना होऊन डिफेन्स देण्यांत आला. सरकारला राजद्रोहाच्या कायद्याची भाषा दुरुस्त करावी लागून स्वतःस सर्व जनतेकडून अन्यायी व खुनशी म्हणून घ्यावें लागलें. वरील वर्षाच्या शिक्षेंतील वेळ फुकट न घालवितां त्यांनीं तो सर्व वेदाचे प्राचीनत्व प्रस्थापित करण्याकडे खर्च केला व 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' या नांवाचा दुसरा एक ग्रंथ सन १८९८ मध्यें सिंहगड येथें लिहून संपविला.

## ताईमहाराज केस.

१९०१ सालीं ताई महाराजांचे दत्तक प्रकरणाचे वादास सुरुवात झाली. त्याची सर्व हकीगत आतां आबालवृद्धांना पूर्ण माहित आहेच. त्याचा पहिला व महत्वाचा भाग १९०४ सालीं फौजदारी खटल्यांतून त्यांची सर्वस्वीं दोषमुक्तता होऊन पुरा झाला. त्यांत त्यांना तीन दिवस तुरुंगवास भोगावा लागला. दत्तकाचे

वादांत टिळकांची वर्षेच्या वर्षे खर्ची पडलीं एवढेंच नाहीं तर इस्टेटीचा कारभार पाहण्याची दगदग सोसून पदरचे ३०।३५ हजार रुपये त्यांना खर्च करावे लागले. अखेरीस प्रिव्हिकौन्सिलपर्यंत वाद जाऊन टिळकांचाच दत्तक शाबीत ठरून त्या कामीं त्यांना पूर्ण यश मिळालें.

## राष्ट्रीय सभेंतील कामगिरी.

देशांतील सार्वजनिक प्रश्नांची वाटाघाट करण्यांत व राजनीतिशास्त्राचा ऊहापोह करण्यांत टिळकांनीं आपलें आयुष्य अगदीं प्रथमपासून कशा रीतीनें खर्च केलें याची यथार्थ कल्पना लोकांस पूर्ण आहेच. टिळकांच्या जाज्वल्य देशाभिमानामुळें त्यांना प्रथमपासूनच अधिकाऱ्यांवर त्यांच्या बेलगामी वर्तनाबद्दल कडक टीका करावी लागे. प्रांतिक परिषदेचे चिटणिसाचें काम त्यांनीं मोठ्या तत्परतेनें केलें.

राष्ट्रीय सभेच्या दहाव्या अधिवेशनाचें वेळीं स्वागत मंडळाचे चिटणिसाचें काम त्यांजकडेसच होतें. परंतु राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरविण्यांत येऊं नये अशा मताचे टिळक असल्यामुळें त्या बाबतींत मतभेद होऊन त्यांनी सेक्रेटरीचे जागेचा राजीनामा दिला. परंतु राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म्हणून ते नेहमीं हजर असत. १९०६ सालापर्यंत राष्ट्रीय सभेमध्यें बऱ्याच महत्त्वाच्या ठरावांवर त्यांनीं भाषणें केली. परंतु हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीच्या शांततेच्या स्वतंत्र वातावरणांत लवकरच पिशाचाचा संचार होऊन ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं म्हटल्याप्रमाणें लॉर्ड कर्झन यांचे कारकीर्दींत झोटिंग पादशाहीस प्रारंभ होऊन सभाबंदीचे हुकूम सुटूं लागले व चौकशीशिवाय हद्दपाऱ्यांचें

सत्र सुरू झालें. जुन्या भिक्षांदेही वृत्तीची चीड येऊन अर्जद्वारां राजकीय हक्कांच्या मागण्या करणें हें तिरस्करणीय आहे अशा मतांचा जास्त जास्त फैलाव होऊं लागला व अखेरीस राष्ट्रीय सभेंत भयंकर पक्षभेद माजून वाद सुरू झाला व त्याचा सुरत येथें कळस झाला. सर फेरोजशहा मेथा, गोखले प्रभृति मंडळींचा एककल्लीपणा व दुराग्रह वाढल्यामुळें टिळकांच्या तडजोडीच्या अविश्रांत प्रयत्नास यश आलें नाहीं. पुढें १९०८ सालीं टिळकांवर अखेरचा राजद्रोहाचा खटला होऊन ते सुटून आल्यानंतर लखनौ येथें १९१६ मध्यें पुन्हा दोन्ही पक्ष एकत्र येऊन मिळाले. हिंदु मुसलमानांची राजकीय आखाड्यांत याच वेळीं कायमची दोस्ती झाली व मुसलमानांच्या डोळ्यावरील सरकारी अधिकाऱ्यांच्या कृष्णकृत्यांचें चिथावणीरूपी पटल दूर झालें.

## सुरतेनंतर

सन १९०७ सालीं सुरतेस कांग्रेसमध्यें दुही झाल्यानंतर राजकीय वातावरण बरेंच खवळून गेलें. दडपशाही सुरू झाल्यामुळें त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं बंगाल्यांत बंडाळी माजली व कांहीं तरुण माथेफिरूंची मनःप्रवृत्ती बॉंब व अत्याचार यांजकडे साहजिकपणें होऊं लागली व मुझफरपूर येथें खुदिराम बोस या नांवाच्या एका बंगाली तरुणानें केनेडी या नांवाच्या दोन इंग्लिश बायांवर त्यांचे गाडींत बॉंब टाकून खून केला. वास्तविक मारणाराचा हेतु तेथील मॅजिस्ट्रेट किंग्स्फोर्ड यांचा प्राण घेण्याचा होता. या खुनामुळें सर्वत्र खळबळ उडून राहिली. मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांतून सरकारच्या झोटिंग पादशाहीबद्दल टीका होऊं लागली. मराठी पत्रांकडून एकमतानें या

बंडाळीचा निषेध करण्यांत आला. परंतु शांतता राखण्याचा उपाय जुलुमी व कडक कायद्याची अंमलबजावणी हा नसून लोकसंमत, सामोपचाराचे व सौम्य उपाय योजले पाहिजेत असेंच सर्वांचें म्हणणें पडलें; परंतु अँग्लो इंडियन पत्रकारांकडून जुलुमी राज्यपद्धतीचा पुरस्कार करण्यांत आला. बाँबचे अत्याचार बंद होण्यास काय उपाय योजावे यासंबंधीं सन १९०८ चे मे व जून महिन्यांमध्यें केसरींत दोन अग्रलेख आले. सदरहू लेखमालेमध्यें असें स्पष्टपणें नमूद केलें होतें कीं, बाँब टाकणें ही गोष्ट अत्यंत गर्हणीय व निंद्य आहे; परंतु त्यास कारण लोक नसून सरकारचें जुलुमी राज्यपद्धतीचें धोरणच आहे व लोकांवर जर सरकारकडून जास्त जुलूम करण्यांत येईल तर हे बाँबचे अत्याचार कमी न होतां अधिकच वाढत जातील; परंतु याचा परिणाम असा झाला कीं, टिळकांना सरदारगृहांत मुंबई येथें वारंटानें एकदम पकडण्यांत येऊन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला उभारण्यांत आला. खटल्याची चौकशी नामदार मुंबई हायकोर्टापुढें तारीख १३ जुलै १९०८ रोजीं ९ ज्यूररसमोर सुरू झाली. त्यांपैकीं ७ युरोपिअन व २ पारशी होते. ज्या लेखाबद्दल खटला करण्यांत आला तो मराठींत छापलेला असून न्यायासनावर बसलेल्या न्यायाधीशास व ९ ज्यूररलोकांपैकीं एकासहि मराठी भाषेचें बिलकूल ज्ञान नव्हतें. टिळकांनीं खटल्याचें काम स्वतः चालविलें व तक्रार सांगण्याचें काम सतत ६ दिवस चालू होतें. त्यांचें भाषण अत्यंत विद्वत्तापूर्ण व न्यायमंदिरांतील वाक्पटुत्वाच्या कलेनें पूर्ण भरलेलें असें झालें. त्यांनीं आपली बाजू विलक्षण बुद्धिकौशल्यानें कोर्टापुढें मांडली. अखेरीस तारीख २२ जुलै १९०८ रोजीं रात्रीं ९॥ वाजेपर्यंत

कोर्टाचें काम चालून ७ विरुद्ध २ अशा ज्यूरीनीं टिळकांना दोषी ठरवून सहा वर्षेंपर्यंत काळे पाणी व १००० रुपये दंड अशी शिक्षा सांगण्यांत आली. ही टिळकांच्या आयुष्यांतील अखेरचीच शिक्षा. ही शिक्षा ऐकून लोकांच्या तोंडचें पाणी पळालें, सर्व मुंबई शहरांत एकच हाहा:कार उडून राहिला, बाजार बंद पडला, मजुरांनीं कामें थांबविली व किरकोळ दंगेधोपे झाले. ही कठोर वज्राघाताप्रमाणें ठोठावलेली शिक्षा ऐकून टिळक शरीरानें अगर मनानें बिलकूल खचून गेले नाहींत. ते पूर्वीपेक्षां जास्त शांत अंत:करणानें ज्यूरीस उद्देशून म्हणाले कीं, " ज्यूरीनें जरी मला दोषी ठरविलें तरी अद्यापि माझें असें म्हणणें आहे कीं, मी पूर्ण निर्दोषी आहे, या जगाची भवितव्यता ठरविणाऱ्या जास्त प्रबळ शक्ति आहेत. मी स्वतंत्र असण्यापेक्षां माझ्या हालअपेष्टांनींच माझ्या अंगीकृत कार्यांत पूर्ण यश यावें अशीच परमेश्वराची इच्छा दिसते. " अशा स्थितींत मंडालेच्या तुरुंगांत टिळकांना ६ वर्षें-पर्यंत बंदिवास पत्करावा लागला.

## गीतारहस्य जन्म.

शिक्षा झाल्यानंतर परमेश्वराच्या कृपेनें आपणांस हा लोकसेवेचा आणखी एक सुयोगच आला म्हणून आनंद मानून लोकमान्यांनीं आपला भगवद्गीतेचा अभ्यास पुढें चालू ठेविला. शिक्षेमुळें न डगमगता अगर अंत:करणाचा धीर खचूं न देतां, दिलेली शिक्षा शांतपणें व धैर्यानें सहन केली. या गोष्टीची आठवण देखील अत्यंत स्फूर्तिदायक आहे. हें एकच उदाहरण त्यांच्या मर्दपणाचें चिन्ह म्हणून तरुण पिढीनें आपले डोळ्यांसमोर ठेवण्यास पुरेसें आहे. तुरुंगांत असतांना आपला सर्व वेळ

गीतारहस्य ग्रंथ लिहिण्यांत घालवून आपल्याकष्टद वेळाचा अशा सत्कार्याकडे शिक्षेचा उपयोग केला. ही त्यांचे आयुष्यांतील अत्यंत उत्कृष्ट व चिरस्मरणीय अशी कामगिरी झाली.

## पुनः कामास सुरवात.

१९१४ सालीं शिक्षा भोगून आल्यानंतर सुरत येथें काँग्रेस मध्यें जी किरकोळ फाटाफूट पडली होती ती नाहींशी व्हावी म्हणून ते नेटानें प्रयत्न करण्यास लागले. सन १९१६ मध्यें, 'हिंदी-स्वराज्य संघ' या नांवाची संस्था बॅ. बॅपटिस्टा यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन करण्यांत आली. लखनौ येथील राष्ट्रीय सभेंत उभय पक्षांत समेट होऊन हिंदुमुसलमानांची एकी झाली. माहे मे १९१६ मध्यें टिळकांच्या मागें आणखी ससेमिरा लावण्याचा ब्युरॉक्रसीनें उद्योग आरंभला. बेळगांव व नगर येथें स्वराज्यावर दिलेल्या व्याख्यानांत आक्षेपार्ह भाषण केलें या आरोपावरून टिळकां-जवळून चांगले वर्तणुकीबद्दल ४०००० चा जामीन मागण्याबद्दल नोटीस काढण्यांत आली, परंतु ब्रिटिश न्यायदेवता अगदींच निद्रिस्त नव्हती. अपिलांत नामदार हायकोर्टानें जामिनकीची नोटीस रद्द केली व स्वराज्याची चळवळ कायदेशीर ठरविण्यांत आली. एका जाळ्यांतून सुटल्यानंतर दुसरें सुदर्शन चक्र लागलें व डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाखालीं पंजाब व दिल्ली प्रांतांत जाण्याची टिळकांना बंदी करण्यांत आली. अशा रीतीनें एका मागून एक रहाटगाडग्या-प्रमाणें खटले व नोटिसांचें सत्र चालू होतें; परंतु यामुळें लोकांची टिळकांवरील श्रद्धा, भक्ति व प्रेम कमी न होतां ती अधिकाधिक वाढत जाऊन त्यांच्या लोकसेवेच्या कामगिरीदाखल फूल नाहीं फुलाची पाकळीं म्हणून जनतेकडून त्यांच्या ६१ व्या वाढदिवसा-

निमित्त त्यांस १ लक्ष रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली. याचें सर्व श्रेय त्यांचे बरोबर राजकीय आखाड्यांत उतरलेले त्यांचे कट्टे भक्त व अनुयायी श्री० नरसोपंत केळकर यांसच आहे.

## विलायतचें डेप्युटेशन.

मुंबईस सन १९१८ सालीं भरलेल्या जादा कॉंग्रेसनें टिळकांची विलायतच्या शिष्ट मंडळाबरोबर पाठवणी केली व तेथें त्यांची कामगिरी ही फारच उत्कृष्टपणें पार पडली. चिरोल केसचा निकाल जरी त्यांचे विरुद्ध झाला तरी त्यांचें मनोधैर्य बिलकूल ढळलें नाहीं. व महाराष्ट्रानेंहि त्यांचेविषयीं आपला पूज्यभाव, अकृत्रिम प्रेम, श्रद्धा व आदर व्यक्त करून खर्चाची ३॥ लाखांची भरती ताबडतोब करून दिली. यायोगानें विलायत सरकारचे डोळे दिपून गेले असतील तर त्यांत नवल काय? टिळकांची उत्साही व न नमणारी वृत्ति अखेरपर्यंत कायम होती. त्यांनीं आजन्म लोकांना शिक्षण देण्यांत व स्वराज्यास आपण कसें लायक आहों व आपण तें सनदशीर मार्गानें झगडून कसें मिळविलें पाहिजे हें उत्तम तऱ्हेनें समजाऊन देण्यांत आपलें आयुष्य घालविलें. टिळकांचें चरित्र हें एक नाटकांतील एका मागून एक घडून येणाऱ्या निरनिराळ्या हृदयद्रावक व स्फूर्तिजनक वीर प्रसंगांनीं पूर्ण भरलेलें असें झालें. त्यांनीं आपल्या आयुष्यांतील प्रयेक क्षणाचा पूर्ण फायदा घेतला. पत्रकार व राजनीतिविशारद या नात्यानें परिणामाची यत्किंचितहि पर्वा न बाळगतां आपल्या स्वतांच्या सरळ धोरणानें आपलें कर्तव्यकर्म करण्यास ते कधींहि कचरले नाहीत. परिणामाविषयीं सदैव बेफिकीर असल्यामुळें कोणत्याहि संकटकाळीं त्यांचे शरीरावर

बिलकूल परिणाम होत नसे. त्यांच्या एवढ्या खंबीर मनाचा माणूस आढळणें कठीण! पराकाष्ठेची संकटपरंपरा हें त्यांच्या चरित्राचें मुख्य लक्षण होय. अधिकाऱ्यांकडून सतत होणाऱ्या गांजणुकीस त्यांनीं मोठ्या धिटाईनें व छातीठोकपणें तोंड दिलें. लोकसेवेंत प्राप्त झालेल्या तुरुंगवासास ते गृहप्रवेश मानीत. व जोंपर्यंत हिंदुस्थानास स्वराज्यप्राप्ति झाली नाहीं तोंपर्यंत सर्व हिंदुस्थान देश हा एक मोठा तुरुंगच आहे असें ते लोकांस वारंवार सांगत. आयुष्यांतील जो काळ दुसऱ्या एकाद्या साध्या माणसास संकटाचा, आणीबाणीचा व कष्टमय असा वाटला असता तो ते ऐहिक तत्त्वज्ञानाच्या उच्चतम सिद्धांताचा गंभीरपणें विचार करण्यांत घालवीत असत. त्यांच्या अंगचें अलोट धैर्य व प्रबळ इच्छाशक्ति यांनीं त्यांस अखेरपर्यंत सोडलें नाहीं. ते जीं तत्वें प्रतिपादन करीत व जें कार्य हातीं घेत तें कार्य ते मोठ्या आसक्तीनें व निष्ठेनें पुरें करीत. महाराष्ट्रांतील लोकांचे हृदयमंदिरांत जाडा पंडित, स्वदेशभक्त व स्वधर्मवीर म्हणून त्यांनीं आपलें कायमचें वसतिस्थान करून ठेवलेलें आहे.

स्वराज्यसंघाचे शिष्टमंडळ १९१८ मध्यें कोलंबोहून निघावयाचें होतें; परंतु ऐनवेळेवर होम डिपार्टमेंट कडून पासपोर्ट रद्द झाल्याबद्दलची वार्ता समजली. अखेर १९१८ चे आक्टोबरमध्यें टिळक विलायतेस जाऊन पोचले. १९१९ चे फेब्रुवारी महिन्याचे वीस तारखेस चिरोल केसचा निकाल झाला. पुष्कळ हिंदी व इंग्लिश मित्रांच्या सहाय्यानें कॉंग्रेसच्या मागण्या युक्त आहेत व इष्ट आहेत अशाबद्दल त्यांनीं तेथें लोकमत अनुकूल करून घेतलें व विलायतेंत हिंदुस्थानास स्वराज्य देण्यासंबंधीं ज्या ज्या प्रचंड

सभा भरविण्यांत आल्या त्यांतूनहि स्वराज्यासंबंधीं लोकमत अनुकूलच झालें. बहुतेक सभांतून टिळकांची भाषणें झालीं. कर्नल वेजवूड यांनीं पार्लमेंटच्या नं. ५ च्या दिवाणखान्यांत भरविलेली सभा अत्यंत महत्वाची झाली. तेथें हिंदुस्थानची हल्लींची राज्यघटना, मांटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा व कॉंग्रेसची योजना यांचें तुलनात्मक असें एक पत्रक तयार करण्यांत येऊन तें पार्लमेंटच्या सभासदांत वाटलें. पार्लमेंटरी कमिटीपुढें लो. टिळकांनीं साक्ष दिली. मि. मॉंग्टेयू यांनीं लो. टिळकांस दोन मुलाखती दिल्या. ना. खापर्डे व श्री० केळकर यांचीं सुधारणेसंबंधानें बरींच परिणामकारक भाषणें झालीं. श्री० केळकर हे विलायतेंत असतांना इंडिया पत्राचे सहकारी संपादक होते. अशा रीतीनें शक्य ते प्रयत्न करून स्वराज्य संघाचें शिष्टमंडळ ता. २६ नोव्हेंबर १९१९ रोजीं मुंबईस येऊन दाखल झालें.

## अमृतसरची कॉंग्रेस.

टिळकांचे हयातींतील लोकांच्या प्रेमाचा कळस म्हणजे त्यांची अमृतसर येथें काढलेली जंगी मिरवणूक. स्टेशन येण्यापूर्वींच दोन दोन मैल पावेतों रेल्वेच्या दोहों बाजूस भगवान् टिळकांचें दर्शनासाठीं लोकांचे थवेच्या थवे उभे होते. रेलवेचा पूल तर माणसांनीं इतका फुलून गेला होता कीं, तो लोकांच्या भारानें खालीं येतो कीं काय अशी दर क्षणीं भीति वाटे. चिखल, पाऊस, थंडी यांस न जुमानतां टिळकांची सहा तास पावेतों शहरांतून मिरवणूक काढण्यांत आली. कांग्रेसचें काम पूर्ण यशस्वी रीतीनें पार पाडून लोकमान्य परत फिरले. माहे मे १९२० मध्यें स्वराज्यसंघाची चतुर्थ परिषद पुणें येथें भरविण्यांत आली व माहे जून मध्यें

कोल्हापूरच्या इस्टेटीसंबंधीं कांहीं वाद नामदार हायकोर्टापुढें चालू होता म्हणून अखेरीस ते मुंबईस जाऊन राहिले. तेव्हां त्यांची प्रकृती साधारण नादुरुस्त होती.

## टिळकांचा अंतकाळ!!!

प्रकृतीचें मान पुढें अधिकच खालावत चाललें. जुलैच्या शेवटचे दोन आठवडे तर अगदीं अंथरूण धरून राहावें लागलें. अंत होण्यापूर्वीं ४।५ दिवस अगोदर आपल्यावर एवढ्या लवकर इतका भयंकर प्रसंग ओढवेल याची कल्पना नव्हती. केसरींतून प्रकृति बिघडली होती आतां थोडी बरी आहे असें प्रसिद्ध करण्यांत आल्यामुळें लोकांस थोडा धीर येऊं लागला होता; परंतु परमेश्वरी नियम कांहीं निराळाच होता. याच वेळीं पासष्टावा वाढदिवस साजरा करण्याचीं निमंत्रणें पाठविण्यांत आलीं होतीं. परंतु लोकमान्यांस अंथरुणावरून हालण्याची ताकद नसल्यामुळें तो प्रसंग साजरा करण्याचें तहकूब ठेवण्यांत आलें. शरीरयंत्रांतील एकएक भाग हळूंहळूं ढिला होऊं लागला. आप्तइष्ट, डॉक्टर वैद्य व स्नेही मंडळी यांचा सरदार गृहांतील लोकमान्यांच्या बिछान्याभोंवती चिंतामग्न स्थितींत पहारा सुरूं झाला.

जो ताप प्रथमतः मलेरिआचा वाटत होता तोच न्यूमोनिया अगर नवज्वराचा असल्याबद्दलचीं स्पष्ट लक्षणें दिसूं लागलीं. उजव्या फुफुसाचा भाग सुजला, कोठा फुगला व त्यामुळें उचकी लागली. अखेरीस वात उद्भवला व तो शेवटपर्यंत उतरला नाहीं. प्रकृति क्षणाक्षणानें क्षीण होत चालली. घटकेंत आशा वाटे कीं लोकमान्यांस हळूहळू बरें वाटेल घटकेंत पुन्हां निराशा होई अशा प्रकारच्या आशा व निराशा यांच्या लाटा प्रतिक्षणीं उसळूं लागल्या.

परंतु आयुष्याची दोरी तुटल्यावर आशेस व निराशेस कोण विचारतो ? सर्व डॉक्टर मंडळी एका पावलावर उभी राहून अहोरात्र टिळकांची एकनिष्ठपणें सेवा करीत होती. जो तो टिळकांची सेवा करण्याचा मान आपल्याला मिळेल कां म्हणून हपापलेला होता. स्वयंसेवकांची व समाचारास येणाऱ्या लोकांची सरदारगृहाच्या चौथ्या मजल्या पासून रस्त्याच्या दारापर्यंत मुंग्याप्रमाणें रांगच्या रांग लागून राहिली होती. सरदार गृहाचे मालक तात्यासाहेब साळवेकर यांनीं तर सर्व व्यवस्था उत्कृष्ट ठेवलेली होती. टिळकांच्या दुखण्यानें मुंबईच काय पण सर्व हिंदुस्थान हलून गेलें होतें. डॉक्टर व वैद्य यांच्या प्रयत्नांत आणखी भर म्हणून कांहीं टिळकभक्तांनीं देवपूजा, रुद्राभिषेक, शांतिपाठ, जप, प्रार्थना वगैरे चालू ठेवून तीर्थ अंगारा प्रसाद वगैरे चालूच होतें. परंतु हे सर्व मानवी प्रयत्न व्यर्थ ठरले. अखेरीस जी डॉक्टर मंडळी लोकांस धीर देत होती त्यांनीं "टिळक आतां मनुष्याधीन स्थितींत राहिलेले नसून ईश्वराधीन झाले" असे निराशेचे उद्गार काढले. त्या वेळीं लोकांचा धीर खचून गेला. समुद्रांत वादळ होऊन बोट बुडूं लागली म्हणजे आंत बसलेल्या लोकांची जी मनःस्थिति होते त्याप्रमाणें तेथील सर्व लोकांची होऊन लोक गांगरून गेले. सर्वांचे डोळे एकसारखे लोकमान्यांच्या शरीराकडे लागून राहिले. अंतःकरणांस पीळ पडून तें विव्हळ होऊं लागलें. हातापायांतील शक्ती नाहींशा होऊन ते लटलटा कांपू लागले. कंबर खचून गेली. प्रत्येकास लोकमान्यांची कांहीं तरी अखेरची सेवा आपल्या हातून घडावी असें वाटूं लागलें. परंतु तें सर्वांच्या नशीबीं कोठून असणार! बुधवार ता. २८ चा दिवस रात्रीं १२ वर १ वाजलेला त्या वेळीं साधारण-

पणें अर्धवट शुद्धि अशी स्थिति होती. १॥ वाजण्याचे सुमारास डॉ. गोपाळराव देशमुख यांनीं इनजेक्शन केलें, व जी घरघर लागली ती अखेरचीच! त्यावर पुनः शुद्धींतील शब्द नाहीं! स्पष्ट उच्चार नाहीं! जीभ आडवी पडलेली! डोळे लाल! छातीचे उडणें चालूच होतें! मस्तकावर बर्फ ठेवला तरी वात कमी होईना! टिळकांचे खोलीपासून तों रस्त्याचे दरवाजापर्यंत आंत मुंगी शिरण्यास वांव नाहीं एवढी लोकांची गर्दी! खोलीपर्यंत पोचण्याची मारामार! प्रत्येकाचा चेहरा खिन्न झालेला! कोणी मान खालीं घालून बाहेर येई! कोणी डोळे पुशीत येई, तर कोणी हंबरडे फोडीत येई अशी निर्वाणीची वेळ येऊन ठेपली. रानडे यांनीं लोकमान्यांच्या प्रकृतीची बातमी टेलिफोनच्या द्वारें क्षणोक्षणीं पुण्यापर्यंत पोहोचविली शाळेंतील विद्यार्थ्यांनीं बातमी कळण्यास वेळ लागला कीं भजन करावे, व मनाचे श्लोक म्हणून समाधान मानावें. परंतु टेलिफोन बिचारा निर्जीव वाटाड्या, तो काय करणार! तो सरदार गृहांत घेतलेला निरोप जशाचा तसा पुण्यांत आणून पोचवीत असे. असें करतां करतां शनवारची रात्र आली! मागील सर्व प्रतिक्षणीं वाटणाऱ्या आशेनें उलट खाल्ली! लोकांचे चेहरे प्रफुल्लित दिसत होते ते सुकण्याचा प्रसंग आला. व रात्रीं १२ वाजून ४० मिनिटांनीं परमेश्वराच्या हुकमांवरून त्या निर्घृण काळानें हिंदुस्थानच्या काळिजावर झडप घातली, व लोकमान्यांच्या कुडींतील प्राण घेऊन गेला. हरहर! येथें लेखणी काम करीत नाहीं! हाताच्या नाड्या थंड पडल्या! डोळ्यापुढें अंधारी आली! परंतु हा ग्रंथ एथेंच आटोपला तर पुढें काय? असो. ईश्वराची मर्जी! सर्व आठवडाभर सर्व लोक आशेनें डोळे लावून बसले होते.

त्यांच्या तोंडांत मारून काळानें टिळकांवर झडप तर घातलीच ! त्यांना कितीही आयुष्य मिळालें असतें तरी तें आम्हांस पाहिजेच होतें ! एकाचें आयुष्य दुसऱ्यास देण्याच्या मोबदल्याचा व्यवहार यमाच्या पेढीवर असता तर महाराष्ट्रांतील हजारों मनुष्यांनीं आपापल्या आयुष्यांतील एकेक वर्ष दिलें असतें. परंतु देशाचेंदुर्दैव ओढवलें तेथेंकोणाचा इलाज चालणार ! सर्व जगाचीं सूत्रें हालविणारा जो परमेश्वर त्यास जी गोष्ट आवडली ती तो करणारच ! मग त्याबद्दल आम्हांला समाधान वाटो अगर न वाटो ! लोकमान्यांचें शरीर पलंगावर पडलेलें ! लहानापासून थोरापर्यंत सर्व जण धायधाय रडूं लागले ! प्रत्येकास आज आपले कुटुंबांतील कर्तासवरता पुरुष जाऊन घराणें उघडें पडल्याप्रमाणें झालें ! सर्व मुंबई शहर विरहानें हळूहळूं लागलें ! गांवोगांव ही शोकजनक वार्ता ताबडतोब कळली. सर्व महाराष्ट्र शोकाग्नीनें होरपळून गेला ! सरदारगृहाभोंवतीं मोठा गराडा पडला ! लोकांच्या झुंडीच्या झुंडी टिळकांच्या अखेरच्या दर्शनास येऊं लागल्या. पुण्याहून स्पेशल येऊन दाखल झाली. टिळकांची दहनभूमि चौपाटीवर पाहिजे म्हणून सरकारकडून स्पेशल परवानगी मिळविली. कोणाच्या तोंडांत पाणी नाहीं, राष्ट्रीयसुतकाच/ दिवस सर्व जातीच्या लोकांकडून सारखा पाळण्यांत आला. टिळकांचें शव पुष्पहारांनीं मंडित करून जरीचे शालजोडीनें आच्छादलेलें, वर रेशमी छत्री धरलेलें सर्व शहरांतून मिरवीत नेण्यांत आलें ! चौपाटीवर जाऊन पोंहोंचेपर्यंत बराच वेळ झाला. मुसळधार पडत आहे, सर्वांचे कपडे भिजून ओले चिंब झाले तरी ते आंत पेटलेल्या शोकाग्नीचे ज्वालांनीं करपले अगर खळखळा वाहणाऱ्या नेत्रांतील अश्रुधारांनीं भिजले याचें कोणासहि भान

राहिलें नाहीं ! अशा स्थितींत लक्षावधी स्त्री पुरुष व मुलें यांचा जमाव लोकमान्यांच्या शवाची वाट पहात वाळवटांत बसला. ती सांवळी मूर्ति आपल्या डोळ्या समोरून लवकरच नाहींशी होणार म्हणून जो तो चितेजवळ जाण्याची खटपट करूं लागला. लोकमान्यांचें शव चंदनाचे चितेवर ठेवून अग्निनारायणाच्या स्वाधीन करण्यांत आलें ! काय तो प्रसंग ! महाराष्ट्राचें रत्न हरपलें ! हिंद देवीचें कपाळावरील सौभाग्य तिलकास ग्रहण लागलें ! नव्हे तो साफ पुसला गेला ! सर्व हिंदुस्थान पोरका झाला ! आकाशचा तारा गळून पडला; कीं रविबिंब ताडकन फुटून गेलें ! कीं प्रळय काळ ओढवला ! कीं प्रचंड धरणीकंपानें हिंदुस्थान दुभंग झाला ! असें सर्व आबाल-वृद्धांस झालें. तोंडाशीं घांस आणून एखाद्या क्षुधितापुढून तो परत न्यावा किंवा अंधळ्याची काठी कोणी त्यास ऐन खड्डया-ज़वळ आणून परत हिसकावून न्यावी अशी महाराष्ट्राची स्थिती झाली. परंतु अशाच प्रसंगीं धीर धरून लोकमान्यांनीं हातीं घेतलेलें कार्य तडीस नेणें हेंच महाराष्ट्राचे खरें कर्तव्य होय ! हेंच त्याचें प्रसंगावधान ! हाच त्याचा बाणेदारपणा ! व हीच लोक-मान्यांची शिकवण ! शिवाजीमहाराजांचे निधनानंतर सर्व महाराष्ट्र गाढ निद्रेंत घोरत पडला असतां हिमालयापासून तों कन्याकुमारी-पर्यंत चळवळीची एकच प्रचंड लाट उसळवून देऊन महाराष्ट्रास खडबडून जर कोणीं जागें केलें असेल तर तें लोकमान्यांनीं. हिंदुस्थानांतील लोकही मेंढरें नसून माणसें आहेत, नुसती शेणामे-णाची निर्जीव बाहुलीं नसून ती क्षात्रवृत्तीचीं जिवंत माणसें आहेत याची कोणी आपल्या दांडग्या कर्तृत्वशक्तीनें मूर्तिमंत साक्ष पटवून

दिली असेल तर ती लोकमान्यांनीं. आमरणांत कोणी आपले हाल हाल करून घेऊन लोकसेवेचें उत्कृष्ट सप्रमाण जिवंत व जळजळीत असें उदाहरण कोणीं घालून दिले असेल तर तें लोकमान्यांनीं. नखशिखांत प्रत्येक रोमरंध्रांतून प्रत्येक रक्ताच्या बिंदूतून स्वदेशप्रेमाच्या व स्वाभिमानाच्या प्रचंड वाऱ्याचा झोत अखंड वाहत असेल तर तोहि लोकमान्यांच्याच. बायकां मुलें, धनदौलत, मान, अपमान, चैन ऐषआराम हें देशसेवेपुढें कःपदार्थ व तृणवत् जर कोणी मानलें असेल तर तें लोकमान्यांनीं. धन्य ती माऊली! व धन्य तो पिता! कीं ज्यांचे पोटी असा राजदिव्य पुरुष उत्पन्न झाला कीं, ज्यानें आपल्या कीर्तीनें सर्व जगांस हालवून सोडलें व अखेर लोकांस हळहळ लावून निघून गेला! अशा नरश्रेष्ठ लो० बळवंतराव टिळकांचे आम्हीं पामरांनीं किती गुण वर्णन करावे? व उपकार किती मानावे? गुलामगिरीच्या शृंखलांनीं जखडून टाकलेला जुलमी कायद्यांच्या कांटेरी कुंपणांत दोंडशें वर्षेपर्यंत कोंडून ठेवलेला हिंदुस्थान हातपाय हालवून बोलूं लागला ही काय कमी जागृती झाली? असा कर्तृत्ववान् धैर्यशाली व उद्योगी पुरुष हा परमेश्वरी अवतारच समजला पाहिजे. असो.

## लोकमान्य गेले! पण पुढें काय?

आतां सर्व हिंदी जनतेनें कितीही कंठशोष केला तरी टिळक परत येणार नाहींत. त्यांच्या आत्म्यास शांति मिळावी व स्वर्गांत त्यांना समाधान वाटावें असें जर महाराष्ट्रास वाटत असेल तर त्यानें लोकमान्यांनीं घालून दिलेल्या मार्गानें जाऊन हिंदुस्थानास स्वराज्य मिळेपर्यंत अहर्निश झगडणें हाच उपाय होय! लोकमान्यांची स्मृति चिरकाल रहावी म्हणून अखिल हिंदवासीयांनीं

त्यांचा वार्षिक श्राद्धाचे दिवशीं व दरसाल श्राद्धतीर्थीस राष्ट्रीय कामगिरीचा आढावा काढण्याचा पवित्र दिवस म्हणून पाळावा. जागजागीं खेड्यापाड्यांतून उत्सव करणें; प्रदर्शन भरविणें, ईश्वरोपासना करणें, अन्नसंतर्पण करणें व हा दिवस अत्यंत पवित्र असें समजून सर्वांनीं आपसांतील भेदभाव विसरून जाऊन सलोख्यानें वागावें. दरसाल श्राद्धतिथीचा दिवस हा टिळक यात्रेचा दिवस म्हणून पाळण्यांत यावा अगर लोकमान्यांची जन्मतिथी व मृत्युतिथी यांत फारच थोड्या दिवसांचें अंतर असल्यामुळें वरील कार्यक्रम हा टिळक सप्ताह म्हणून त्या सप्ताहांत पुरा करावा. आपल्या हक्कसंरक्षणासाठीं लोकमत तयार करावें. सुशिक्षित लोकांचीं हरएक प्रश्नांवर व्याख्यानें करवावीं. अशा रीतीनें सालेसाल खेड्यापाडयांतून तालुक्यांतून शहरांतून जिल्हा निहाय राष्ट्रीय दिवस म्हणून पाळण्यांत यावा व राष्ट्रीय सभेंतील ठरावांची अंमलबजावणी करण्यांत यावी. वरीलप्रमाणें खटपट चालविली तर लोकमान्यांच्या चरित्रांतील महत्वाच्या कामगिरीचा एक भाग पुरा केल्यासारखें होणार आहे. व तेव्हांच आपणांस टिळकांचे खरे अनुयायी व भक्त म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. केवळ पुतळे उभारून राष्ट्रीय शाळा काढून अगर मोफत वाचनालयांची स्थापना करून टिळकांच्या ऋणांतून आपण मुक्त झालों असें कोणीहि समजूं नये. ही सर्व जबाबदारी पुढील तरुण पिढीवर आहे. तारीख १ आगष्ट १९२१ हा पहिल्याच वर्षश्राद्धाचा दिवस असल्याकारणानें वरील कार्यास जितका जास्त उत्साहानें व जोमानें प्रारंभ होईल तितकी त्यांत यशःप्राप्ति येण्याचा जास्त संभव आहे. मजला जे विचार सुचले ते लोकांपुढें मांडण्याचें माझें

कर्तव्य असें समजून मी लोकांपुढें मांडले आहेत; तसेंच लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांचेसंबंधीं एतद्देशीय व परदेशांतील वर्तमानपत्रकारांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांतील महत्वाची मतें खालीं दिली आहेत. शिवाय सर्वसाधारणपणें लोकमान्यांचें स्वभावगुणवर्णन थोडक्यांत निराळें दिलें आहे. इतकें सुचवून मी हें आरंभिलेलें लहानशा पुस्तकाचें काम पुरें करून वाचकांची रजा घेतों.

---

## स्वभाव–गुणवर्णन

### लोकमान्यांचें धैर्य.

लोकमान्यांच्या जवळ कसलें अचाट धैर्य होतें ह्याचीं त्यांनीं आपल्या सार्वजनिक व खासगी आयुष्यांत कित्येक वेळां साक्ष पटवून दिली आहे. ते निधड्या छातीचे पुरुष होते. कसलाहि प्रसंग गुदरो ते कधींहि डगमगत नसत. अशा वेळीं त्यांच्या आसपासच्या मंडळीला ह्या पुरुषाला काळीज आहे कीं नाहीं अशी शंका येई. १९०८ च्या राजद्रोहाच्या खटल्यांत न्यायाधिशांनीं जेव्हा त्यांना ६ वर्षांच्या काळेपाण्याची शिक्षा दिली, तेव्हां कोर्टांत सर्वत्र हाहाःकार उडाला. सर्वांच्या नेत्रांतून अश्रूंचे पाट वाहूं लागले. कित्येकांचें काळीज फाटून गेलें, कित्येकांना ती भयंकर काळाशिक्षा ऐकून मूर्च्छा आली; परंतु प्रत्यक्ष लोकमान्य मात्र मेरूपर्वताप्रमाणें अचल व समुद्राप्रमाणें गंभीर होते. चिरंजीवाच्या मृत्यूच्या वेळीं तर त्यांच्या धैर्याच्या स्थैर्याची कमालच झाली.

त्यांची शुश्रूषा करतां आली तेवढी त्यांनीं स्वतः केली, व शेवटीं अंत झाल्यावर त्यांनीं ' प्रयत्नापेक्षां जास्त काय करावयाचें आहे ' असें म्हणून स्मशानविधीपासून एकंदर उत्तर कार्यें निमूटपणें केलीं. दुःखाचा डोंगर कोसळला असताही ते आपली खासगी व सार्वजनीक कार्यें शांतवृत्तीनें व निमूटपणें करीत.

## लोकमान्यांचा स्वार्थत्याग.

लोकमान्यांच्या स्वार्थत्यागी स्वभावाची तर कल्पनाच होणें शक्य नाहीं. त्यांची विद्वत्ता त्यांचे अंगचे इतर थक्क करून सोडणारे गुण व लोकमान्यांनीं ज्या वेळेस देशसेवेला सुरवात केली त्यावेळची परिस्थिती लक्षांत घेता, द्रव्याच्या बाबतींत त्यांनीं केवढा स्वार्थत्याग केला आहे ह्याची थोडी कल्पना होईल. लोकमान्य जर द्रव्यसंचय करण्याचें मनांत आणून त्या दृष्टीनें जर आपल्या आयुष्यक्रमाची आंखणी करते तर त्यांनीं खोऱ्यानें पैसा ओढला असता ह्याबद्दल कोणालाही शंका नाहीं. परंतु लोकमान्यांचा स्वार्थत्याग एकअंगी नव्हता. लोकमान्यांनीं नुसता पैशाच्या बाबतींत स्वार्थत्याग केला असें नव्हे तर मनुष्यप्राण्याला शक्य आहे तितक्या प्रकारचा स्वार्थत्याग त्यांनीं केला आहे. इंग्रजी राज्यांत अगर संस्थानांत अशी एकहि बहुमानांची जागा नव्हती व नाहीं कीं, जी लोकमान्यांच्या पायावर लोटांगण घेत आली नसती. जगांत अशी एकही पदवी नाहीं, कीं, जिचा लोकमान्यांनीं स्वीकार केला असतां तर तिनें आपण धन्य झालों असें मानलें नसतें. बरें, त्यांनीं स्वतःच्या इतर सुखाकडे तरी पाहिलें कां ? नाहीं, देशाकरितां त्यांनीं आपल्या कुटुंबाचा बळी दिला, शरिराची आहुती दिली; हवे तितके कष्ट सोसले, आपल्या देशाची

3313/00156 

मान्यता वाढावी म्हणून त्यांनीं आपल्या मानापमानावर निखारा ठेवला. जीं जीं कार्यें त्यांनीं हातांत घेतलीं त्या त्या कार्यांत शक्य तितका व शक्य त्या प्रकारचा स्वार्थत्याग त्यांनीं केला. आमच्या देशांतच काय जगांत सुद्धां स्वार्थत्यागाचें असलें दुसरें उदाहरण मिळणें कठीण आहे.

## नित्यक्रम.

लोकमान्य बहुधा सकाळीं साडेसाहा वाजतां उठत असत. रात्रीं जागरण झालें असल्यास ही वेळ साडे सात पर्यंत जात असे. सकाळीं ७ वाजता टपाल आल्यावर ते अगोदर आपली खाजगी पत्रें वाचीत व मग वर्तमानपत्रावरून नजर फेकीत. नंतर छाप-खाना किंवा आफिस ह्याबद्दल रा. विध्वंस व केसरी मराठा पत्राचे संपादक यांचाशीं थोडें भाषण होई. नंतर कोणी भेटावयास आले असल्यास त्यांची भेट घेत. त्यांच्या येथें येण्याला कोणालाहि मज्जाव नसे. अगदीं मुक्तद्वार. कोणी भेटावयास आले नसल्यास ते लायब्ररींत वाचीत बसत. त्यांचें जेवण अगदीं साधें असे. भोजनानंतर त्यांना नेहमीं निजण्याची संवय असे. लहानपणीं व्यायामाचा नाद असल्यामुळें त्यांची प्रकृती निरोगी असे. ते कधीं कधीं फर्ग्यूसन कॉलेजकडे फिरावयास जात. घरीं परत आल्यावर कोणी भेटावयास आले असल्यास त्यांची हे गांठ घेत व नंतर जेवावयास उठत. जेवण झाल्यावर एकादें पुस्तक घेऊन ते आराम खुर्चीवर वाचीत पडत.

## कौटुंबिक स्वभाव.

ह्यांच्या पत्नी अत्यंत सुशील व मुलें, माणसें अत्यंत आज्ञाधारक असल्यामुळें ह्यांना कौटुंबिक सुखाचा पूर्ण लाभ झाला होता.

3313

प्रपंचावर यांच्या कुटुंबाची देखरेख असल्यामुळें त्यांना तिकडे फारसे पहावें लागत नसे. ह्यांचे सर्वांत वडील चिरंजीव विश्वानाथपंत १९०३ सालीं प्लेगनें वारले. ह्यांचे दुसरे चिरंजीव रामभाऊ व तिसरे चिरंजीव बापू ह्यांच्या तिन्ही मुली विवाहित आहेत. लोकमान्यांच्या पत्नी लोकमान्य मंडालेला असतां पतिविरहानें हा मृत्युलोक सोडून गेल्या. हे आपलया मुलांना स्वतः शिकवीत असत. मुलांना धाकदपटशा दाखवून किंवा मारून शिक्षण देण्याच्या पद्धतीचा त्यांना तिटकारा असल्यामुळें ते मुलांशीं गोडीगुलाबीनें, त्यांच्या तंत्रानें व त्यांच्यांत समंजसपणा उत्पन्न होईल अशाच रीतीनें वर्तन करीत.

## पोषाख.

आंगांत एक पांढरा सदरा, त्यावर एक पांढरा अंगरखा, पायांत पुणेरी जोडा, नेसावयास साधी धोतरें व पांघरायला साधी उपरणीं, व डोकीवर एक पुणेरी तांबडी पगडी हाच त्यांचा नेहमींचा पोषाख. बाहेर जातांना हातांत एक सोटा असे. ह्या पोषाखांत कालत्रयीं फरक झालेला कोणाच्या पाहण्यांत आलेला नाहीं. प्रवसांत कधीं ओव्हरकोटचा व पायमोजा, स्लीपर यांचा उपयोग करीत असत. त्यांच्या पेशवाई पोषाखांत फरक झालेला कोणाच्या पाहण्यांत आला नव्हता, म्हणूनच ज्या वेळेस ते विलायतेला जाण्याकरितां निघाले तेव्हां लोकमान्य आतां कोणचा पोषाख करणार ह्याबद्दल सर्वांना मोठा अचंबा व कौतूक वाटलें.

## व्यसन.

ह्यांना चहाची संवय कांहीं दिवस होती; परंतु पुढें त्यांनीं चहा सोडून दिला होता. त्यांना सुपारी खाण्याची मोठी विलक्षण

संग्रय होती. वाटेल त्या वेळेस जरूर लागतांच हाताला सुपारी लागावी म्हणून वाड्यांत ठिकठिकाणीं सुपारी व आडकित्ते ठेविलेले असत. बंडीचा खिसा सुपारींनीं भरलेला असे. व्याख्यानाला सुरवात करण्यापूर्वीं तोंडांतून सुपारी काढून टाकतांना पुष्कळांनीं त्यांना पाहिलें आहे.

## लोकमान्यांचे विनोद.

लोकमान्यांचें चरित्र वाचून पुष्कळांना त्यांच्याबद्दल एक प्रकारची भीति वाटत असे. असला हा अफाट पुरुष कीं, जो कृतांतकाळालाही थप्पड देण्यास कमी करीत नाहीं तो मोठा क्रूर असला पाहिजे अशी एक वेडी समजूत पुष्कळ लोकांची असे. त्यामुळें कित्येकांना त्यांना भेटावयाला जाण्याची सुद्धां भीति वाटत असे. परंतु प्रत्यक्ष भेट होतांच ही भीति पार मावळून जाई, असा प्रत्येकाचा अनुभव आहे. संभाषणाला सुरवात होतांच पुढें बसलेला व आपल्याशीं बोलत असलेला पुरुष आपल्याला वाटत होता तसा क्रूर नाहीं तर अगदीं साधा व शांत असून सौम्य भाषण करणारा आहे असें समजतांच भेटीस आलेल्या मनुष्याच्या अंतःकरणाला आनंद होई. येवढा राजकारणी पुरुष परंतु आपल्याशीं अगदीं मोकळ्या मनानें बोलत आहे असें पहातांच दुसऱ्याचें अंतःकरण प्रेमातिशयानें उचंबळून जाई. लोकमान्य शांत व सौम्यपणें मोकळ्या दिलानें बोलतात येवढेंच नव्हे तर ते विनोदीही आहेत असें लवकरच त्यांच्या प्रत्ययाला येई.

## लोकमान्यांचा विनोदि स्वभाव.

बाबामहाराजांच्या इस्टेटीसबंधाचा खटला संपावयाचे वेळीं रा. दादासाहेब करंदीकरांनीं जो डिफेन्स दिला त्याचा गोषवारा

केसरीकरितां मराठींत देत असतां वरचेवर 'ताईमहाराज' हा शब्द येऊं लागला त्या वेळीं लोकमान्य हंसून म्हणाले, महाराजांना आमच्या येथें जागा नाहीं; 'म' घालून पूर्ण विराम द्या म्हणजे झालें.

एकदां लेख लिहीत डोक्यावरची टोपी कोठें पडली होती ती सांपडेना. दिवस थंडीचे व खिडक्या उघड्या असल्यामुळें पश्चिमेकडे गार वारें सुटून डोक्यास झोंबत होतें. त्या वेळीं लोकमान्य म्हणाले, अरे टोपी कोठें पडली? गार वारें लागतें; डोकें थंड झाल्यावर लोकमान्यांच्या ह्या विनोदी स्वभावानें संकटकाळीं सुद्धां सोडले नाहीं. ताईमहाराजाचे खटल्याच्या वेळीं मि. क्लेमेंट्सच्या निकालाच्या आदल्या दिवशीं ते कांहीं लिहीत बसले असतां त्यांचे एक स्नेही तेथें आले व म्हणाले, 'काय बळवंतराव? उद्यां सुटता कीं नाहीं. इतके दिवस मार तक्रारीवर तक्रारी केल्या, आतां उद्यां काय तक्रार करणार? हें ऐकून लोकमान्यांनीं उत्तर दिलें, 'अहो नाहीं सोडलें तर अपील करावयाचें, जामिनावर सोडा म्हणावयाचें, ही आमची तक्रारच आहे. आणि सोडूनच दिलें तर आमची कांहींच तक्रार नाहीं.'

एके वेळीं लोकमान्य एकाचा अर्ज लिहवीत होते. इतक्यांत त्यांचे एक स्नेही तेथें आले आणि म्हणाले, "बळवंतराव, आतांही लोकांचे अर्ज तुम्ही लिहीतच आहा! ह्या वेळीं सुद्धां तुमच्याकडून काम करवून घेतल्याशिवाय तुम्हाला सोडीत नाहींत!" यांवर लोकमान्य थोडे हांसले आणि म्हणाले, "अहो, हें असेंच चालावयाचें. चिता पेटली तरी आमची विडी पेटलीच पाहिजे, असें म्हणणारे कांहीं असतातच"!

## लोकमान्य हट्टी.

लोकमान्य हट्टी होते; असें म्हणतात आणि खरोखरच ते तसे होते. परंतु त्यांचा हट्टीपणा जगांत कांहीं तरी कार्य करून जाण्याकरितां जन्माला आलेल्या पुरुषाचा होता. ते स्वतःच म्हणत कीं, हट्टी माणसेंच जगांत कांहीं तरी करून जातात. आणि हें त्यांचें म्हणणें किती सत्य होतें हें त्यांनीं आपल्या आयुष्यांत केलेल्या अचाट कृत्यांनीं सिद्ध करून दिलें आहे. थोर माणसांचें अंतःकरण आम्हाला समजत नाहीं. आणि म्हणूनच त्यांचा आग्रह अम्हाला हट्टीपणा दिसतो.

## लोकमान्यांची चिकाटी.

लोकमान्यांचा स्वभाव मूळांत तापट. मीच जवळ जवळ ४० वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांतील हरप्रकारच्या अनुभवानें, अफाट वाचनानें व खोल विचारानें त्या तापटपणाला थोडी गंभीरपणाची व शांत वृत्तीची जोड मिळाली होती. तरी पण शेवटपर्यंत त्यांची घडाडी कमी झाली नव्हती. कोणतेंही कार्य एकदां अंगीकृत केलें कीं, मग तें तडीस नेईपर्यंत स्वस्थ बसावयाचें नाहीं. पाण्यासारखा पैसा खर्च करतील, अविश्रांत श्रम करतील, आपल्या अतुल बुद्धिवैभवाला हवें तसें कामीं आणतील; कार्यसिद्धीकरितां पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला जावें लागलें तरी जातील, रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र करून आपल्या शरीराचा बळी देतील; परंतु कार्याचा शेवट लावल्याशिवाय त्यांच्या मनाला व शरीराला स्वास्थ्य मिळणें शक्य नाहीं. त्यांची ही चिकाटी अवर्णनीय होती. त्यांनीं जें जें कार्य म्हणून हातीं घेतलें तें तें शेवटाला नेल्याशिवाय मध्येंच टाकून दिलें असें कधींही झालेलें नाहीं.

नदीचा लोंढा समुद्रापर्यंत गेला पाहिजे. त्यांच्या अद्‌भुतपूर्ण चरित्रांत अशा किती तरी गोष्टी आहेत, एक ना दोन कीं, ज्या त्यांच्या ह्या तडफीची व चिकाटीची साक्ष देतील. ग्लोब पत्रावर त्यांनीं अब्रूनुकसानीची फिर्याद लंदन हायकोर्टमध्यें लावली होती. ग्लोब पत्र म्हणजे श्रीमंत व वजनदार एका हिंदी गृहस्थांनीं फिर्याद लावलेली आणि आजचा काल नव्हता. खटला एक वर्ष चालला होता. लोकमान्यांनीं अखेर ग्लोबला दांतीं तृण धरून नाक घासावयाला लावलें. ह्या लोकमान्यांच्या दृढनिश्चयी स्वभावाबद्दल न्या. रानडे यांनीं सुद्धां "टिळकांनीं म्हणूनच ही गोष्ट केली, इतरांच्या हातून कधींच झाली नसती असे उद्गार काढले. लोकमान्यांच्या ह्या चिकाटी व दृढनिश्चयी स्वभावाचें ढळढळीत उदाहरण म्हटलें म्हणजे ताईमहाराजांची केस. ह्या केसकरितां लोकमान्यांनीं काय केलें तें एक लोकमान्यांनाच माहीत. बाबामहाराज १८९७ मध्यें परलोकवासी झाले. आज लोकमान्यांच्या निधनापर्यंत म्हणजे जवळ जवळ २३ वर्षें ही ताईमहाराजांची केस कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें सुरू आहे. लोकमान्यांनीं ह्या केसमध्यें पैशाकडे पाहिलें नाहीं, श्रमाकडे पाहिलें नाहीं, विरुद्ध पक्षाला कसली मंडळी आहेत हें पाहिलें नाहीं, त्यांनीं प्रिव्हीकौन्सिलपर्यंत ही केस नेली व तेथें विजय संपादन केला. लोकमान्य धन्य आहे आपली. ह्या खटल्यांत आपली चिकाटी, आपला दृढनिश्चयीपणा, अविश्रांत श्रम करण्याचें आपलें सामर्थ्य तर आम्हाला समजलेंच; परंतु ह्यांत आपला साधु पुरुषांना साजेल असा एक गुणही आम्हाला समजला·

ज्याला एकदां आपलें म्हटलें त्याच्या कारितां प्राण देण्यास सुद्ध। आपण तयार होता हेंही पण आपण आम्हाला शिकविलेंत.

## वाचन.

लोकमान्यांचें वाचन किती विस्तृत व व्यापक ह्याची साधारण मनुष्याला कल्पनाच होणें नाहीं, त्यांचा एक गीतारहस्य हाच ग्रंथ वाचला तर वाचणारा भांबावूनच जातो. ह्या गृहस्थांनीं वाचलें नाहीं असें ह्या जगांत कांहीं उरलें तरी आहे का ? व ह्याला हें सर्व वाचावयाला एक आयुष्य पुरलें तरी कसें ? ह्या विचारानें मती गुंग होऊन तो तोंडांत बोटच घालून राहतो. कलियुगांत एकच काय पण हजारो कर्तव्यांची जाणीव उत्पन्न करण्याकरितां दुसरा कृष्णच अवतरला होता असें प्रत्येकाला वाटल्यावांचून राहत नाहीं.

## स्मरणशक्ति.

ह्यांची स्मरणशक्ति इतकी दांडगी होती कीं, अमुक विषय अमक्या ग्रंथांत वाचला आहे किंवा अमुक लेख अमक्या सालांत लिहिला आहे एवढेंच तें सांगत असें नाहीं, तर पुष्कळ वेळा त्या पुस्तकांतील त्या विषयाचे नेमकें पानही ताबडतोब काढून देत.

## लोकमान्यांचे कायदेज्ञान.

लोकमान्य जाडे कायदेपंडित होते. त्यांचें कायद्याचें ज्ञान अत्यंत विस्तृत व सर्वपैलू होते. स्वतःवर झालेल्या खटल्यांत विशेषतः १९०८ च्या राजद्रोहाच्या खटल्यांत ताईमहाराजांच्या केसमध्यें, चिरोल केसमध्यें त्यांचें कायद्याचें ज्ञान किती अगाध असलें पाहिजे हे सर्वांना पटलें आहे. ह्या सर्व खटल्यांत जरूर तेथेंच ते वकील अगर बॅरिस्टर यांचा उपयोग करीत; बाकी सर्व काम तेंच करीत. १९०८ मधील मुंबई हायकोर्ट मधील खटला

त्यांनीं स्वतःच चालविला होता. त्याशिवाय कोठले कोठले लोक त्यांना कायद्याचा सल्ला विचारावयास येत. विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे सल्ला विचारावयास येणारा गरीब शेतकरी जरी असला तरी लोकमान्य त्याला एक पैही न घेतां पूर्ण विचार करून सल्ला देत. जणू काय स्वतःवरच्या खटल्याचाच ते विचार करीत आहेत.

# पत्रकर्त्यांचे अभिप्राय.

**न्यू टाईम्स कराची**—गोखले, फेरोझशहामेथा आणि दादाभाई या सर्वांच्यापेक्षां लो. टिळकांची कामगिरी निःसंशय श्रेष्ठ आहे. त्याचा निसर्गतःच डेमोक्रॅटिक तत्त्वाकडे कल होता. परंतु त्यांनीं लोकछंदानुवर्तित्व कधींहि केलें नाहीं तर उलट लोकमताला आपल्या मताकडे खेंचून आणलें. मोझेसनें ज्याप्रमाणें आपल्या लोकांस 'वचनदत्त भूमी' च्या टप्यांत आणलें त्याप्रमाणें टिळकांनीं हिंदी लोकांस 'स्वराज्यभूमीच्या' जवळपास आणून सोडलें.

**सर्चलाइट, पाटणा**—आपणास देशाभिमानाचें बाळकडू पाश्चात्यांपासून मिळालें अशी कित्येकांची भावना असते व त्याची त्यांस शरमहि वाटत नाहीं. टिळकांचा देशाभिमान असला परप्रकाशित नसून त्यांच्या देशाभिमानाचा उगम भारतीय इतिहासापासून व प्राचीन वाङ्मयासून होता म्हणूनच तो इतका जोमदार व चिकाटीचा होता. गीतारहस्यात सांगितल्याप्रमाणें ते निष्काम कर्मयोगी होते ! आणि आजमितीला हिंदी लोक जर पूर्वीपेक्षां स्वराज्याची मागणी जास्त हट्टानें करीत असतील तर तो गीतारहस्याचें तत्त्व त्यांच्या मनांत बिंबल्याचाच परिणाम होय. त्यांच्या मृत्यूमुळें राष्ट्रीय भावनांचा उगमच बंद झाल्याप्रमाणें झालें. तथापि त्यांचा आत्मा ह्या सुकणाऱ्या झऱ्याला स्वराज्यजीवनाचा पुरवठा करो अशी आपण प्रार्थना करूं या.

**जास्टिस, मद्रास**—रा. टिळक हे १८९४ पासून स्वराज्यवादी आहेत. त्यांच्यावर स्वार्थत्यागाचे, धोक्याचे व खटल्याचे

अनेक प्रसंग आले पण ते केव्हांहि कशालाहि डरले नाहींत व कशालाहि भिऊन त्यांनीं आपलीं मतें लपविलीं नाहींत अथवा भलती तडजोड केली नाहीं. सर फेरोझशहा मेथांच्या पाठीमागें ना. गोखले हे जगले असते तरी टिळकांनीं गोखल्यांना बाजूस सारून कॉंग्रेस काबीज केली असती. कारण गोखल्यांच्या आंगीं मेथा आणि टिळक ह्यांच्यासारखें पुढारीपणाचे गुण मुळींच नव्हते. टिळकांसारखे पराक्रमी यांच्यावर हल्लींच्या प्रसंगीं काळाची झडप पडली याबद्दल आम्हास अत्यंत खेद वाटतो.

अ. ब. पत्रिका, कलकत्ता—टिळकांच्या मृत्यूनें भरतभूमीचा एक अतिशय पराक्रमी पुत्र नाहींसा झाला आहे. लहानथोर सर्व प्रकारचे लोक त्यांना देवाप्रमाणें मान देत. हिंदुस्थानामध्यें इतर कोणाहिपेक्षां हेच राष्ट्रीय पुढारी म्हणविले जाण्यास जास्त पात्र व सर्वांना अनुकरणीय होते. ते फक्त सुशिक्षितांचेच पुढारी होते असें नव्हे तर सामान्य जनसमूहाचेहि ते पुढारी होते. त्यांच्या तोडीचे पुढारी फारच थोडे सांपडतील. त्यांचें अत्यंत शुद्ध असें चारित्र्य व स्वार्थत्याग व त्यांनीं देशाकरितां सोसलेलीं संकटें यांमुळें ते आपले राष्ट्रास केवळ देवाप्रमाणें भासत.

इंडिपेंडंट, अलाहाबाद—टिळकांनीं आपल्या देशाची सेवा अपरंपार दुःखें सोसून केली. त्यांचा प्रत्येक क्षण व प्रत्येक विचार आपल्या देशास उच्च पद कसें मिळेल या कामींच खर्च होत असे. जुलमी सत्तेपुढें मान न वांकवितां तिला तोंड देण्याच्या त्यांच्या धैर्याची खरी पारख किती लोकांना झाली असेल याची शंकाच आहे. त्यांनीं लोकांचे अंगांतील भित्रेपणा पार झाडून टाकला, व

तेथें आत्मविश्वास उत्पन्न केला व असें करितांना कोणत्याहि संकटास जुमानलें नाहीं.

खानदेशवैभव, धुळें—महाराष्ट्रांतील एक दैदीप्यमान व लोकपक्षाचा खरा व जोमदार पुढारी इहलोक सोडून गेला हें महाराष्ट्राचेंच नव्हे तर सर्व हिंदुस्थानचें दुर्दैव समजलें पाहिजे. लोकमान्य हे केवळ महाराष्ट्रांतील पुढारी नसून हिंदुस्थानांतील लोकशाहीचे एक उत्तम, धैर्यशाली, विद्वान नेते होते.

सर्व्हंट ऑफ इंडिया, पुणें:—मराठी वृत्तपत्रकारांचा धंदा प्रथम स्थापन करणें, संकटांतून पुनः पुनः वर डोकें काढणें, सरकारच्या रोषास तोंड देणें, देशप्रीतिसाठीं तुरुंगवास पत्करणें, स्वतंत्र अशीं नवीं पुस्तकें लिहिणें, एक पिढीपावेतों देशाच्या बऱ्याचशा भागांतील राजकीय चळवळीवर आपली छाप ठेवणें, व मरते वेळीं पाठीमागें सुसंघटित असा एक मोठा पक्ष ठेवून जाणें, या सर्व गोष्टींच्या योगानें ते आपल्या देशबांधवांच्या प्रेमादरास निःसंशय पात्र होतात.

न्यू इंडिया, मद्रास—टिळकांच्या विद्वत्तेपेक्षांहि त्यांची देशभक्ति फार उत्कट होती. देशाचे बाबतींत ते स्वतःस पार विसरले होते. आत्मयज्ञ हा त्यांचा एक ढळढळीत गुण होता. देशसेवेचे बाबतींत स्वार्थत्याग करणें व स्वतःस संकटांत घालणें या गोष्टींचा ते विचारच करीत नसत. त्यांची देशप्रीति हा गुणच इतका मोठा आहे कीं, त्यामुळेंच त्यांचें नांव अजरामर होऊन राहील.

इंदुप्रकाश, मुंबई—देशाच्या उद्धाराकरितां त्यांच्याइतका आपत्ति सोसलेला एकहि लोकनायक आजपर्यंत झालेला नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आपल्या हालअपेष्टांनींच देशाच्या

उन्नतीची गति सुकर होईल असा कट्टया निर्धाराचा आत्मविश्वास त्यानींच प्रथम दाखविला. त्यामुळेंच त्यांना अनन्य सुलभ ' लोकमान्य ' ही स्पृहणीय पदवी प्राप्त झाली. उत्साह, देशाभिमान, अपार धैर्य, विलक्षण चिकाटी, प्रत्येक विषयाचा ठाव शोधून काढणारी मर्मज्ञ बुद्धिमत्ता, कडवा करारी बाणा, इत्यादि अनेक दुर्लभ गुणांची मूर्ति टिळक या शब्दाच्या उच्चारासरशीं प्रत्येक हिंदभक्ताच्या नेत्रासमोर येऊन उभी रहात असे.

**ट्रिब्यून, लाहोर**—टिळकांची व्यक्ति म्हणजेच एक राजकीय संस्था, एका तत्वाचें मूर्तिमंत स्वरूप व हिंदी राजकारणी व्यवस्थित पद्धति असे. इतक्या गुणाचा समुच्चय दुसरे कोणत्याहि हिंदी पुढाऱ्यांत आढळून येत नाहीं. ते हिंदी राष्टीय तत्त्वाचे आद्यजनक होते. ते काँग्रेसमधील व देशांतील एका मोठ्या पक्षाचे निर्विवाद पुढारी होते. त्यांचा दृढ निश्चय, त्यांचे भाषणस्वातंत्र्य, त्यांचें स्वावलंबन, त्यांचा आत्मविश्वास, त्यांची स्वदेशीबद्दल निष्ठा यांनीं देशास पुढें येण्यास फार मदत झाली आहे. काँग्रेसच्या राष्ट्रीय तत्त्वाचा सामान्य जनामध्यें त्यांनींच प्रसार केला. त्यांचे इतकी सामान्य लोकांवर दुसरे कोणाचीहि छाप नव्हती.

**उदय, उमरावती**—नवजीवनाच्या संचारानें स्फुरण पावणारा असा आजचा, सर्व राष्ट्र व्यापून उरलेला, जोमदार राष्ट्रीय पक्ष जर कोणी निर्माण केला' असेल तर निर्माण करण्याचें लोकोत्तर सामर्थ्य एकट्या लोकमान्यांनींच दाखविलें. हिंदुस्थानाला जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीला जाऊन बसण्याची जर कोणी महत्त्वाकांक्षा उत्पन केली असेल तर ती लोकमान्यांनींच. लोकमान्यांस जी लोकांकडून मान्यता मिळाली व ते जे जनतेच्या गळ्यांतील ताईत

होऊन बसले ते विद्वतेच्या अगर सरळ स्वभावाच्या जोरावर नसून त्यांनीं आजन्म आत्मयज्ञाच्या कुंडांत ज्या परार्थ स्वसुखाच्या आहुति दिल्या त्यामुळेंच ते देवासारखे पूज्य झाले.

**हिंदू मद्रास**—हिंदी राष्ट्रीय तत्त्वांचा पुरस्कार करण्याबद्दल ज्या कांहीं लोकांविषयीं आपणास अभिमान वाटला पाहिजे त्यांत टिळकांची गणना सर्वांचे शिरोभागीं केली पाहिजे. आपला देश पुढें येण्याकरितां टिळकांच्याइतके अखंड व मनःपूर्वक कष्ट दुसरे कोणींहि भोगले नाहींत. टिळकांचे मृत्यूमुळें झालेली हानि लवकर भरून निघण्यासारखी नाहीं. व देशाच्या हल्लींच्या बिकट परिस्थितींत तर त्यांचें हिंदी लोकांवरील वजन व त्यांचा उपदेश यांची वारंवार उणीव भासेल. ' टिळक ' या व्यक्तीचे नांवापेक्षां त्यामुळें प्रादुर्भूत होणाऱ्या तत्त्वांचेंच जास्त महत्त्व आहे; म्हणून त्यांची उत्कृष्ट देशभक्ती व त्यांचा अपूर्व स्वार्थत्याग याचें फळ केव्हांहि स्मृतींतून जाणार नाहीं.

**एक्सप्रेस, बांकीपूर**—टिळकांचे मृत्यूमुळें एक विद्वान गृहस्थ, स्वार्थत्यागी देशभक्त व शाहाणा मुत्सद्दीच नाहींसा झाला आहे. त्यांची जनतेवर उत्तम तऱ्हेची छाप होती व लोकहि त्यांना मान देण्यास सदैव तत्पर असत. ते धैर्याचे केवळ पुतळेच होत, व राजकारणांतील एक मोटी शक्ती होते. साधी राहाणी व उच्च विचार यांचे ते एक अवतारच होते, त्यांची उत्कृष्ट देशभक्ती म्हणजे एक त्यांचा धर्मच होता. ते आपल्या देशाकरितां सरकाच्या मानापमानास मुळींच भीक न घालतां सदैव आपलें कर्तव्य करीत राहिले.

**लीडर, अलाहाबाद**—टिळक हे एक मूर्तिमंत संस्थाच होते. व त्यांचे निषाणाखालीं त्यांचेच विचाराचे पुष्कळ लोक गोळा झाले होते. ते एक अस्सल मराठा होते. व ' मराठा ' या नांवामें उद्भूत होणारे सर्व गुणदोष त्यांच्यांत होते. त्यांचा मुख्य गुण ते विद्यार्थिदशेंत असतांच ढळढळीत दिसूं लागला होता. आपण परकी अमलाखालीं आहों ही गोष्ट त्यांना फार अपमानास्पद वाटत असे. त्यांना हळूहळू सुधारणा करण्याची कल्पना कधींच पटली नाहीं. गेलेली स्वतंत्रता परत मिळविण्यास आनुभूत अशी राजकीय चळवळ पाहिजे अशी त्यांची खात्री होती. राजकर्त्यास वेळोवेळीं अडवणें, त्यांना सुधारणा करण्यास भाग पाडणें व त्यांना राष्ट्रीय आकांक्षा तृप्त करावयास लावणें ही त्यांची राजनीति होती आणि यांच तत्वाचा त्यांनीं उपदेश केला व स्वतःहि तसेंच वागले. टिळक हे त्यांना खालीं पाडण्याच्या कोणत्याहि सरकारच्या प्रयत्नास न जुमानतां उच्च पदावर चढले व त्यांच्यावर लोकांची सदासर्वदा जितकी भक्ती होती, तितकी दुसऱ्या कोणावरहि नव्हती; व त्यांच्या पक्षास जितके अनुयायी मिळाले होते तितके दुसऱ्या कोणासहि मिळाले नाहींत.

**लोकसंग्रह, पुणें**—गेल्या पाऊणशें वर्षांत कर्तृत्वानें पुढें आलेल्या सर्व पुढाऱ्यांत टिळक हे स्वपराक्रमानें अग्रेसर राहिले. राष्ट्रीय पक्षाचा उगम टिळकांपासून झाला. आणि राष्ट्रीय पक्षाची धुरा अर्थातच त्यांनींच आजपर्यंत वागविली. टिळकांची धडाडी, कर्तृत्व, निर्भयता, वजनदारी, चिकाटी आणि चातुर्य, यांच्या जोरावर राष्ट्रीय पक्षाचीं लक्षणें ठरून चुकलीं. त्यांचीं संस्कृत भाषेंतील पारंगतता, गणित विषयावरील प्राविण्य, ज्योतिषशास्त्राचें इत्थंभूत

ज्ञान, कायदेपांडित्य, व्यवहारचातुर्य, वेदांताची मर्मज्ञता, शोधकता आणि सर्व विषयांत सारखी गति इत्यादि बिनमोल गुणांमुळें टिळकांच्या लोकनायकत्वास अष्टपैलुत्व प्राप्त झालें होतें.

**महाराष्ट्र, नागपूर**—लोकमान्यांचें अवघें आयुष्य स्वराज्यप्राप्तीच्या खटपटींत गेलें. ही त्यांची खटपट थेट मरणापर्यंत सुरूं होती. त्यांच्या मृत्यूनें महाराष्ट्र–नव्हे हिंदुस्थान–अनाथ व पोरकें झालें आहे. बिनधोकपणें डोळे मिटून जर कोणाच्या पाठीमागें चालण्यासारखा पुढारी असेल तर तो टिळकच होय. तो आपल्या अनुयायास कधींही सोडणार नाहीं किंवा तोंडघशीं पाडणार नाहीं. संकट असेल तेथें प्रथम तो स्वतः उडी घेईल व नंतर आपल्या अनुयायांस बोलावील अशी सर्वांची खात्री झाली होती, आणि म्हणूनच सबंध हिंदुस्थान आज टिळकांकडे पहात आहे.

**राजकारण, पुणें**—प्रथमारंभीं पूर्वीच्या पिढीमध्यें रूढ झालेले दोष व पूर्वीच्या पिढीचें मवाळ व मेषपात्रास शोभणारें धोरण यांच्याविरुद्ध दोन हात करून या गचाळपणाचा नायनाट करण्याचें कार्य त्यांना कित्येक वर्षें करावें लागलें. त्यामुळें पूर्वीच्या पिढींतले लब्धप्रतिष्ठित पुढारी त्यांना विध्वंसक म्हणूं लागले. लोकमान्यांइतका सतत व चिकाटीनें काम करणारा प्रतिमासंपन्न मार्गदर्शक राष्ट्रीयत्वाच्या नवीन चळवळीला महाराष्ट्राशिवाय अन्यत्र कोठें लाभला नव्हता. ‘ झाले बहु होतिल बहु, आहेतहि बहु परंतु यांसम हा ’ हा अनन्यसामान्य स्तुतिपर चरण लो. टिळक यांसच लावावा असें कोणसही वाटल्यावांचून राहणार नाहीं.

**प्रजामित्र, मुंबई**—त्यांनीं राष्ट्राकरितां फार हाल सोसले व त्यांचें सर्व आयुष्य राष्ट्रकार्यास वाहिलेलें होतें ही गोष्ट त्यांच्या शत्रूसहि

नाकबूल करतां यावयाची नाहीं. हिंदुस्तानच्या जागृतीस या अत्यंत सामर्थ्यवान पुरुषाचा अतिशय उपयोग झाला.

**मुंबईसमाचार**—टिळक हे महावीर व कट्टे देशभक्त होते. त्यांची विद्वत्ता पंडितासहि मान्य झाली होती. स्वराज्याची नौबत सगळ्या राष्ट्रभर जी आज झडत आहे तें टिळकांच्या परिश्रमाचें फल होय.

**जामेजमशेद**, मुंबई—मुत्सद्देगिरी, चिकाटी वगैरे गुणांत टिळकांचा हातखंडा होता. पण त्याहून त्यांची विद्वत्ता दांडगी होती. मुंबई युनिव्हार्सिटीनें टिळकांस एलएल. डी. ची पदवी दिली नाहीं ही लांछनास्पद गोष्ट होय.

**हिंदुस्थान**, मुंबई—स्वराज्याच्या मंत्राचा उपदेश करण्यांत टिळकांनीं कधींच माघार घेतली नाहीं; व त्यांनीं सर्व राष्ट्र खडबडून जागें करून सोडलें.

**श्रीशाहू**, सातारा—लोकमान्यांनीं केलेल्या कामगिरीचें अवलोकन केलें असतां एका माणसाच्या हातूनच केवढी मोठी कामगिरी झाली हें ध्यानांत येऊन फार अचंबा वाटतो. केवढी असाधारणशक्ति! केवढा आत्मविश्वास ! केवढी असामान्य कळकळ ! केवढें मनोधैर्य !

**शुभसूचक ( सातारा )**—उत्तम शील, निष्कलंक खासगी वर्तन, साधी रहाणी, उत्कट देशभक्ति, जाज्वल्य देशाभिमान, अढळ धैर्य, विलक्षण करारी स्वभाव, निष्काम कर्मप्रियता, स्वार्थत्याग, आत्मविश्वास, इत्यादि मोठा गुणसमुच्चय टिळकांचे अंगीं होता, म्हणूनच ते एवढ्या लोकमान्यतेस चढून महाराष्ट्राच्या अनभिषिक्त राज्यपदाप्रत पोंचले.

**लोकमत**, यवतमाळ—त्यांचा कडवा बाणेदारपणा, त्यांचा निश्चयी स्वभाव, नोकरशाहीचे आघात लीलेनें सहन करणारी

त्यांची कणखर राष्ट्रीय वृत्ति, आकाश कोसळून पडलें तरी अढळ राहणारी त्याची शांति, आपत्तींतून नवे नवे मार्ग हुडकून काढून आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढें ढकलण्यास समर्थ करणारी त्यांची कल्पक बुद्धि, कोणतीहि चळवळ बेसनदशीर मार्गाच्या खडकावर आपटूं न देण्याची त्यांची धूर्तता, नोकरशाहीशीं टक्कर देणारा त्यांचा छातीठोकपणा, लोकसंग्रह करण्याचें त्यांचें अलौकिक चातुर्य, राष्ट्राचें कल्याण साधत असेल तर आपल्या प्रतिपक्षाशींहि नमते घेऊन त्यांच्याशीं तडजोड करण्याचें त्यांचें धोरण हा त्यांच्या आंगचा गुणसमुच्चय आठवला म्हणजे त्यांचें निधन ही फक्त महाराष्ट्राचीच नव्हे तर सर्व भरतखंडाचीच आपत्ति होय.

**इंडियन सोशल रिफार्मर**—रा. टिळकांचे विरुद्ध असा एक आक्षेप घेण्यांत येतो कीं, त्यांनीं विधायक स्वरूपाचें कोणतेंहि कार्य केलें नाहीं. परंतु खरें पाहू गेलों असतां राष्ट्राच्या इतिहासांत विधायक व विध्वंसक कार्यें यांमधील भेदरेषाच स्पष्टपणें आखणें कठिण असते. गुलामगिरीची संस्था नाहींशी करणें ही कामगिरी देखील विध्वंसक स्वरूपाचीच होती. त्यास आमचें उत्तर एवढेंच कीं, राष्ट्राची वाढ होण्यास जातींचें बंधन नाहींसें झालेंच पाहिजे. रा. टिळकांची देखील तीच स्थिति होती. व राष्ट्रांची राजकीय उन्नति होण्याकरितां नोकरशाहीचा नाश झालाच पाहिजे, अशी त्यांची समजूत असे.

**विद्याविलास, कोल्हापूर**—लोकमान्यांच्या निधनानें महाराष्ट्र व हिंदुस्थान तर हळहळलेच; परंतु परकीय राष्ट्रांतील ज्या ज्या लोकांस लोकमान्यांची उज्ज्वल देशभक्ति, निस्सीम स्वार्थत्याग, अचाट बुद्धि, सामर्थ्य, अपार धैर्य, विलक्षण चिकाटी, शुद्ध खासगी

चारित्र्य, लोकोन्नतीची कळकळ, साधेपणा इत्यादि गुण कळले आहेत त्या त्या लोकांस अत्यंत दुःख झाल्यावांचून राहणार नाही.

**प्रकाश, सातारा**—लोकमान्यांच्या निधनानें महाराष्ट्राचेंच नव्हे तर सर्व हिंदुस्थानचें केवढें अपरिमित नुकसान झालें आहे याची कल्पना करणें अत्यंत धाडसाचें आहे. लो. टिळकांसारखा प्रतापशाली दैदिप्यमान पुढारी पेशवाईच्या ऐतिहासिक कालानंतर आजपर्यंत झाला नाहीं.

**पंचम जॉर्ज-विजय, बेळगांव**—मातृभूमीचें गतवैभव परत आणणें हें त्यांच्या जीविताचें ध्येय होतें. स्वातंत्र्याकरितां अविश्रांत झगडा, असें त्यांच्या देशबांधवास व पुढील पिढीला सांगणें हेंच त्यांच्या जीविताचें कर्तव्य होतें.

**गोरक्षण, ठाणें**—गरीबांचा कैवारी व राष्ट्राचा मायबाप काळानें आपल्या जबड्यांत ओढून घेतला ! श्रीशिवाजीमहाराजांच्या देहावसानाची भयंकर वेळ महाराष्ट्रास आठवली ! महाराष्ट्राचा अनभिषिक्त राजा गेला. टिळकांवांचून भरतखंड पोरकें झालें !

**हिंदु मिशनरी, मुंबई**—बळवंतरावजींचें चरित्र रमणीय आणि बोधप्रद असें आहे. त्यांच्या चरित्रांत महाराष्ट्राचा आणि हिंदुस्थानचा ४० वर्षांचा इतिहास ग्रथित झाला आहे. सर्वत्र प्रतिकूल परिस्थिति असतां हिंदुस्थानाला जागृत करणारा हा प्रवृत्तिमार्गी संत जन्माला आला. त्यानें 'कर्मज्यायो ह्यकर्मणः' हें ध्येय पुढें केलें, गीता कर्मपर लावून दाखविली, माया म्हणजे सामर्थ्य असा अर्थ केला, स्वार्थाची निवृत्ति आणि परार्थाची प्रवृत्ति शिकविली. त्यांनीं ४० वर्षें कष्ट करून लोकजागृति केली. त्यांना तेजस्वी स्वाभिमान राष्ट्रभर पाहिजे होता तो त्यांनीं जागृत केला.

विद्यमान परिस्थितींत जें धोरण लोकजागृतीसाठीं पाहिजे होतें तेंच त्यांनीं पत्करिलें. लोकनायक हा वीरपुरुष असावा लागतो तेव्हांच तो असें धोरण पत्करून निर्भयपणें व धैर्यानें वागूं व वावरूं शकतो. बळवंतरावजी हे पुरे वीर पुरुष होते. त्यांचें राजकारण धीरोदात्त असे. धर्मविषयाकडेहि त्यांचें लक्ष असे.

**विद्याप्रसार, गोंवा**—लो. टिळक राजकारणाच्या आखाड्यांत उतरल्यापासून आजपर्यंतच्या ३०–४० वर्षांत महाराष्ट्रांत अशी एकहि राजकीय चळवळ झाली नाहीं कीं तिच्याशीं प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें टिळकांचा संबंध आला नाहीं. धाडसी वृत्तींत व हातीं घेतलेल्या कोणत्याहि कार्यापासून कसल्याहि प्रकारच्या अडचणीमुळें मागें न सरण्याच्या बाबतींत तर आज उभ्या हिंदुस्थानांत त्यांच्या तोडीचा दुसरा एकहि पुरुष नाहीं.

**कल्पतरु, सोलापूर**—राजकीय कामांत लोकमान्यांशीं कोणाचा कितीहि मतभेद असो, परंतु टिळकांनीं केलेली देशसेवा, त्यांनीं दाखविलेलें धैर्य, देशासाठीं सोसलेले कारागृहवास, महाराष्ट्रांतील लोकमत तयार करण्याचे कामीं दाखविलेली कर्तबगारी वगैरेबद्दल दोन मतें असण्याचें कारण नाहीं. लोकमान्य ही पदवी बळवंतरावजींनाच मिळाली यावरून त्यांची देशसेवा व लोकांचें त्यांच्याविषयींचें प्रेम यांची सहज कल्पना होण्यासारखी आहे. मरेपर्यंत त्यांनीं देशसेवेचें काम क्षणभरहि बाजूस केलें नाहीं.

**साऊथ इंडियन मेल, मदुरा**—टिळक हे राष्ट्रीय तत्त्वाचे जनक होते. ते देशाकरितां जन्मले, ते देशाकरितां जगले, ते देशाकरितां लढले व ते राष्ट्रकार्य करतांकरतांच कालवश झाले. ते दृढनिश्चयी होते, संकटें भोगावयास तयार झाल्याशिवाय आपली

प्रगति होणार नाहीं असें त्यांचें मत होतें व याच तत्वाचा त्यांना राष्ट्रभर प्रसार केला. ते स्वतः संकटें भोगावयास केव्हांहि तयार असत.

बकुल, रत्नागिरी—काळाच्या या आत्यंतिक निष्ठुर कृतीनें, देशभक्ताचा मूर्तिमंत अवतार, बंधुप्रीतीचा मूर्तिमंत पुतळा, स्वार्थत्यागाची प्रचंड ज्योत, राष्ट्रधर्माचा प्रणेता, उत्साहाची प्रतिमा, कर्मयोगाचा प्रवर्तक, दुर्बळांचा पाठिराखा, भीतजनांच्या मनांत धैर्याचा संचार करणारा, राजकीय जीवनयात्रेंत चांचपडत ठेंचा खाणारांचा मार्गदर्शक, अशा लोकनायकाला आम्ही मुकलों आहों.

दि लिबरल, लाहोर—रा. टिळकांचा मृत्यु म्हणजे एक राष्ट्रावर आलेलें संकटच होय. त्यांनीं आपल्या देशाकरितां अतोनात कष्ट सोसले. सध्या आपला देश अत्यंत बिकट परिस्थितींत असल्यामुळें त्यांच्या शांत व दूरदर्शी सल्ल्याची आम्हास आज फार जरूर होती. ही हानि बराच काळपावेतों भरून येणें शक्य नाहीं.

दि मुसलमान, कलकत्ता—रा. टिळकांनीं आपली चळवळ केव्हांहि थांबविली नाहीं. परंतु त्यांची चळवळ केवळ शाब्दिक नसून ती ते कृतींतहि आणीत असत. ते साहसी व स्वाभिमानी होते. अधिकाऱ्यांचा दाब किंवा लालूच यांचा त्यांजवर पगडा बसत नसे. लोकसत्तेचे ते कट्टे पुरस्कर्ते होते व बहुजनसमाजाबद्दल त्यांचे मनांत आदर वास करीत असे. कांग्रेस व मुस्लिम लीग यांचे दरम्यान सलोखा घडवून आणणें हें पुष्कळ अंशीं त्यांच्याच प्रयत्नाचें फळ होय. असहकारितेचें तत्त्व त्यांस पूर्ण पटलें नसतांहि आम्ही जी दिशा आंखू तिला पाठबळ देण्यास ते अगदीं तत्पर

असल्यामुळें त्यांनीं मुसलमानांचीहि प्रीति संपादिली. त्यांचे मृत्युमुळें हिंदु व मुसलमान या दोनहि जातींची हानि झाली आहे.

**कर्नाटक लीडर, ( कारवार )**—मागील ३० वर्षांपासून रा. टिळक यांचें चरित्र देशासभोर आहे. त्यांचे शास्त्रीय शोध, त्यांचा देशभिमान व अविश्रांत चळवळ इत्यादि गुणांमुळें आजकालच्या इतर कोणत्याहि देशभक्त पुढाऱ्यांपेक्षां अधिक लोकप्रियता त्यांनीं संपादन केली. त्यांची विशाल बुद्धिमत्ता व राजकीय क्षेत्रांतील त्यांची अतुल कामगिरी हीं त्यांच्या प्रतिस्पर्धी लोकांस देखील मान्य आहेत. त्यांच्या मृत्यूमुळें हिंदुस्थानचें खरोखरीच नुकसान झालें आहे.

**संदेश**—महाराष्ट्राकरितां लोकमान्य तुमच्यावर संकटें तरी किती आलीं ? ह्या देशासाठीं तुम्हीं

**चार वेळा तुरुंगांत तर गेलां !**

आणि ह्यांशिवाय तुम्हीं इतर अनंत प्रकारचे जे क्लेश भोगलेले आहेत त्यांना सीमाच नाहीं. ह्या देशाच्या सेवेकरितां तुम्ही आपल्या भाग्याचीं कोठारें लुटूं दिलेलीं आहेत, आपली संपत्ति पुनर्वसूच्या पावसाप्रमाणें धो धो ओतलेली आहे, ह्या देशाकरितां तुम्ही आपल्या कुडीची फाडी केलेली आहे, ह्या देशाकरितां आपल्या बुद्धीची कपाटें तुम्ही सताड उघडीं ठेवलेलीं आहेत, ह्या देशाकरितां तुमचा मेन्दु झिजलेला आहे, ह्या देशाकरितां तुमचें शौर्य झुंजलेलें आहे ! ह्या देशाकरितां तुम्ही आपल्या

**प्र.णांचा होम**

केलेला आहे. तुम्ही ह्या देशाला काय दिलेलें नाहीं, त्याचेकरितां काय संकट आपल्यावर ओढून घेतलेलें नाहीं ? अहर्निश देशाची

चिंता करणारें मन, अहर्निश देशाच्या गोष्टी बोलणारी जिव्हा, अहर्निश देशाची सेवा करणारें शरीर आणि अहर्निश ह्या थोर गोष्टी पहाणारे महाराष्ट्रांतील डोंगर, नद्या, सरोवरें, अरण्यें, हीं सर्व तुमच्या अनुपम देशभक्तीचे, अतुल देशसेवेचे, असामान्य स्वार्थत्यागाचे, अमोल उद्योगव्यापृतपणाचे साक्षीदार आहेत. तो गायकवाडवाडा! कीं जेथें हजारों व्याख्यानप्रसंग झाले आणि ते सर्व देशाकरितां झाले! तें पुण्यवान पुणें! कीं ज्यानें सारखी चाळीस वर्षे तुमची पवित्र काया झेलली, पृष्ठावर वाहिली, तो महाराष्ट्रीय प्रदेश कीं जेथें तुमची छबी नाहीं असा एक गांव नाहीं एक शीव नाहीं, आणि तो

येरवड्याचा, तो साबरमतीचा तुरुंग

कीं तुमच्या सर्व लोकोत्तर देशसेवेचें प्रत्यक्ष अवलोकन करण्याचें भाग्य ज्याला एकट्यालाच लाभलें सर्व–हे सर्व तुमच्या संस्कृतीचे साक्षीदार आहेत. हें सांगतील कीं, ह्या निधड्या छातीच्या पुरुषानें ह्या महाराष्ट्राचें जीवन आपल्या जीवनांत इतकें रंगवून, इतकें गुंगवून इतकें तन्मय करून टाकलें होतें कीं चाळीस वर्षेपर्यंत टिळक म्हणजेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजेच टिळक होते.

ज्ञानप्रकाश, पुणें—रा. टिळक यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रावर एक प्रकारची भयंकर ग्लानीची छाया पसरली असून रा. टिळकांचे अनुयायी, आप्त, इष्ट व स्नेही यांच्यांवर तर ही आकाशींची कुऱ्हाडच कोसळली आहे! त्यांच्या निधनामुळें हिंदी राजकीय चळवळीचाहि एक करारी व धैर्यशील पुढारी नाहींसा झाला असून, संस्कृत वाङ्मय व तत्त्वज्ञान यांच्या संशोधनाची तर अपरिमित हानि झाली आहे. रा. टिळकांच्या निधनामुळें त्यांच्या राजकीय

प्रतिस्पर्ध्यांनाही पराकाष्ठेचें दुःख झाल्याखेरीज राहणार नाहीं. कारण, राजकीय चळवळीबद्दल, सामाजिक मतांबद्दल किंवा कार्यपद्धतीविषयीं रा. टिळकांबरोबर त्यांच्या प्रतिपक्षांतील पुढाऱ्यांचा कितीहि तीव्र मतभेद असला, तरी त्यांचा उज्ज्वल देशाभिमान, जाज्वल्य देशभक्ति, स्पृहणीय धैर्य आणि उद्यमशीलता व त्या सर्वांवर झळकणारी त्यांची विशाल बुद्धिमत्ता व विद्वत्ता या गुणांबद्दल सर्वांना अत्यंत आदर वाटत असे. गेलीं चाळीस वर्षें आपल्या स्वतःहाच्या कल्पनेप्रमाणें देशोन्नतीच्या कामीं स्वार्थत्यागपूर्वक अविश्रांत श्रमकरणारा हा पुढारी अखेर काळानें ओढून नेला हें पाहून हिंदुस्थांनातील सर्व पक्षांच्या, जातींच्या व मतांच्या लोकांना दुःख होईल. वृत्तपत्रकार या नात्यानें त्यांनीं व्यक्त केलेलें धैर्य व तुरुंगातील वेळांत तयार केलेली ग्रंथसंपत्ति हे नांव इतिहासांत संस्मरणीय करण्यास पुरेशीं आहेत. रा. टिळकांच्या अंगच्या निग्रहाचें अनुकरण करून देशसेवेची दीक्षा घेणें हाच त्यांच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्याचा खरा उपाय आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे. व आपापल्या प्रामाणिक बुद्धीनें कार्य करण्यास निश्चयानें प्रवृत्त होणें हाच रा. टिळकांविषयीं उतराई होण्याचा मार्ग आहे.

**बॉंबे क्रॉनिकल**—चळवळ करा, चळवळ करा, चळवळ करा, हाच धडा लोकमान्यांनीं लोकांना घालून दिला आहे. आमचें ध्येय साध्य होईपर्यंत लोकमान्यांनीं घालून दिलेला हा धडा आपण विसरतां कामा नये. देशकार्याची जी धुरा लोकमान्यांनीं अत्यंत जबाबदारीनें वाहिली होती तें कार्य यशस्वी रीतीनें पार पाडण्यास दुप्पट जोरानें आपण कामास लागलें पाहिजे. या कार्याकरितां दिव-

सेंदिवस वाढत्या प्रमाणावर कराव्या लागणाऱ्या स्वार्थत्यागास आपण तयार झालें पाहिजे.

**मँचेस्टर गार्डियन**—गोखले हे टिळकांविषयीं असें म्हणत असत कीं, ते ब्रिटिश अमलापूर्वी जन्मास येते तर त्यांनीं नवीन राज्य कमावलें असतें. त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ हा होता कीं, हिंदुस्थानच्या सध्याच्या स्थितींत टिळकांसारख्या कर्तबगार माणसास आपले गुण दाखविण्यास वाव मिळत नाहीं. अँग्लोइंडियन लोकांस टिळकांचा मोठा दरारा वाटत असे व त्यांचें लोकांवरील वजन हें एक मोठें संकट आहे असें ते मानीत. त्यांच्या अलौलिक गुणाबद्दल कोणाचाहि वाद नाहीं. हिंदुस्थानास स्वायत्तता पाहिजे हें त्यांचें नेहमीं मागणें असे. ब्रिटिश लोकांचा संबंध तोडून टाकण्याची त्यांची इच्छा नव्हती. ते जहाल पक्षांचे जनक व मुख्य पुरस्कर्ते असून त्यांजवर दाब कसा ठेवावयाचा हा सरकारी वर्गापुढें मोठाच प्रश्न होता. त्यांजवर अनेक दावे व खटले उभे करणें यांखेरीज त्यास कोणताहि मार्ग सुचला नाहीं. परंतु टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांचा जो सन्मान करण्यांत आला त्याचे योगानें हिंदुस्थानची प्रचलित राज्यपद्धति व जनतेचें लोकमत यांत किती तफावत आहे हें अधिकारी वर्गासमुद्धां कळून आलें असेलच. हिंदुस्थानांत किंवा इतर कोणत्याहि देशांत लोकांच्या पुढाऱ्यांस सरकारशीं इतकें झगडावें लागलें नसेल. हिंदुस्थानच्या जनतेवर टिळकांच्या एक चतुर्थांशाइतकेंहि वजन दुसऱ्या एखाद्या पुढाऱ्याचें नाहीं. त्यांच्यासंबंधीं तटस्थ वृत्ति कोणाचीच नसे. कांहीं लोक त्यांची देव म्हणून पूजा करीत तर इतर त्यांचा तीव्र विरोध करीत.

**डेली हेरल्ड**—हिंदी लोकांकरितां स्वराज्याचा हक्क मागणारे जे

कित्येक पुढारी आहेत त्या सर्वांहून टिळकांचाचा नोकरशाहीकडून अधिक द्वेष होत असे. जबाबदार पद्धतीचें मुख्य अंग म्हणजे कार्यकारी सरकारावर लोकांचा ताबा असणें हें मॉंटेग्यु बिलांत दिलें नसल्यामुळें त्याचा उपयोग होणार नाहीं असें त्यांचें मत होतें. हिंदुस्थानास वसाहतीचें स्वराज्य मिळेपावेतों चळवळ चालू ठेवण्याचा त्यांचा निर्धार होता. त्यांनीं सुरू केलेली चळवळ त्यांच्या मृत्यूनंतरहि तशीच चालू राहील.

**डेली न्यूज**—रा. टिळकांच्या मृत्यूमुळें हिंदुस्थानच्या राजकारणावर छाप ठेवणारा पुरुष नाहींसा झाला आहे. त्यांच्या आयुष्यांत त्यांचेवर अनेक संकटें आलीं व सरकारास त्यांचा नेहमीं संशय वाटत असे. हिंदुस्थानांत ब्रिटिश अमलाची सुरुवात होण्यापूर्वी त्या देशांतील मुलूख ज्या मराठा जातीच्या ताब्यांत होता तिजमध्यें त्यांचा जन्म झाला होता. ते विद्वान,संशोधक, वकील व वृत्तपत्रकार होते. परंतु इंग्लडांत चळवळ्ये म्हणूनच त्यांची मुख्यत्वेंकरून प्रसिद्ध होती.

**इंडिया, लंडन**—विशेष वादविवाद न करितां देखील त्यांस आपल्या प्रतिस्पर्ध्याचें मत वळवितां येई, निदान त्यांचें मत बरेंच फिरवितां तरी येई. कैक वेळां त्यांनीं लोकांस आपलीं मतें बदलावयास लावलीं. पार्लमेंटच्या जॉइंट कमिटीपुढें त्यांनीं साक्ष दिली त्या वेळीं हें विशेष स्पष्टपणें दिसून आलें. त्यांनीं साक्ष देण्यास सुरवात केली त्या वेळीं कमिटींतील सभासदांचें मत त्यांस प्रतिकूल होतें; परंतु हळूहळू त्यांनीं त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करून कमिटीचा बराचसा दुराग्रह दूर केला. कांहीं लोक त्यांचा अत्यंत द्वेष करीत तर इतरांचें त्यांजवर निरतिशय प्रेम असे, यांचा

अत्यंत छळ झाला तरी जनतेचा त्यांस भक्कम पाठिंबा असे. मराठे लोकांवर पारतंत्र्याचें जूं अगदीं अखेरीस आलें तसाच त्यांनीं या परतंत्र्यांतून अगदीं प्रथम मार्ग काढला. त्यांस प्रख्यात शिक्षणप्रसारक, नामांकित वकील किंवा विद्वान संशोधक होतां आलें असतें, परंतु पारतंत्र्यांत खितपत असलेल्या देशाकरितां त्यांनीं हीं सर्व आमिषें सोडून निरंतर लोकजागृति करण्यांतच आपलें आयुष्य खर्च केलें.

**कर्नाटकवृत्त, धारवाड**—भारतभूमातेचा सौभाग्यतिलकच नाहींसा झाला. स्वातंत्र्य देवीच्या भव्य आणि पवित्र मंदिराच्या पायथ्यापाशीं तिला धरून आणणारा वाटाड्या एकाएकीं अदृश्य झाला. १०० वर्षे पारतंत्र्यचिखलांत आकंठ रुतून राहिलेल्या भूमातेचे दोनहि हात धरून तिला वर उचण्यास विश्वप्रयत्न करणारा महान् वीर एकदम दिसेनासा झाला. द्वापार युगांत अर्जुनाला कर्मयोगाचें रहस्य समजावून त्याच्यांत कर्तव्यनिष्ठा जागृत करून त्याला उत्कर्षाच्या मार्गास लावण्याकरितां भगवान् योगेश्वर श्रीकृष्णांनीं प्रतिपादिलेल्या भगवद्गीतेस या कलियुगीं मलीनता आली असतां ती मलीनता आपल्या अमोघ आणि अधिकारयुक्त वाणीनें साफ धुवून काढून व गीतेचें यथार्थ स्वरूप लोकांच्या नजरेस आणून देणारा महातत्त्वज्ञानी अंतर्धान पावला असतां, भारतभूमातेच्या भालप्रदेशीं लटकणारी अनेक प्रकारच्या वज्र-वैडूर्य-माणिक-पुष्परागादि बहुमोल रत्नजडित असा दिव्य बिंदीबिजवराच हरपला.

**कर्नाटकमित्र बेंगरूल**—अभागी हिंदी मातेस स्वातंत्र्याची ओळख करून देणारा स्वातंत्र्यदूतच आज समाधिस्थ झाला,

डोळ्यांआड झालेल्या स्वातंत्र्य देवीस हिंदमातेच्या सन्मुख आणून उभी करणें हेंच त्यांच्या जन्माचें मुख्य कार्य झाल्यामुळें, तें तडीस नेण्याकरितां लोकमान्य ४० वर्षें मोठ्या नेटानें अहर्निश झटले. पण शेवटीं हिंदमातेच्या उद्धारक पुत्रानें मृत्युलोकांतील ही निराशा जनक परिस्थिति जाणून ईश्वराकडे शिष्टाई करण्याकरितांच परलोकचा मार्ग स्वीकारला कीं काय कोण जाणें, असेंच कोणालाही वाटणें स्वाभाविक आहे. आजच्या समाजांत आपलें अवतारकार्य संपवून पुढील मोठ्या कार्याकरितां त्यांना प्रत्यक्ष परमेश्वराकडेच धांवत जावें लागलें असेंच जाणून मनाचें समाधान करणें भाग आहे.

---

## लोकमान्यांचा गुणगौरव.

लो. टिळक परलोकवासी झाले हें हृदयभेदक वृत्त कानीं आल्यापासून अनेक वृत्तपत्रांनीं व प्रसिद्ध पुढाऱ्यांनीं त्यांच्याविषयींचा आपला आदरभाव व्यक्त केला आहे. त्या सर्वांचे सर्वच लेख अगर उद्गार देतां येणें शक्य नाहीं; तथापि त्यांतल्या कांहीं निवडक लेखांचा व उद्गारांचा सारांश पुढें देण्यांत येत आहे—

**म. गांधी**—लोकमान्य टिळक हे जनतेचें दैवत होते व जनता त्यांचा शब्द वेदासारखा प्रमाणभूत मानीत असे. यांतलें बीज हेंच कीं देशभक्ति हाच त्यांचा धर्म होऊन बसला होता. ते स्वभावतःच डेमोक्रेट ( लोकसत्तावादी ) होते आणि बहुमतानें कोणत्याहि गोष्टीचा निर्णय लागावा याविषयीं त्यांचा इतका

आग्रह असे कीं, मलाहि त्यांचें एखादे वेळीं भय वाटे. स्वराज्याचा पुरस्कार त्यांच्यासारखा सुसंगतपणानें व चिकाटीनें दुसऱ्या कोणीहि केला नाहीं. ते कधींच गलितधैर्य झाले नाहींत व त्यांच्यावर निराशा केव्हांच आपला पगडा बसवूं शकली नाहीं. त्यांनीं स्वराज्य मिळविण्याचा काळ किती तरी वर्षांनीं अलीकडे आणला. इंग्लिशांचा द्वेष करीत असत ही समजूत साफ चुकीची आहे. अभिनव भारताचा जनक म्हणून त्यांचें नांव इतिहासांत अजरामर होईल. लोकमान्यांचें धैर्य, त्यांची साधी रहाणी, त्यांचा दांडगा उद्योग, आणि त्यांची अढळ देशभक्ति हे गुण आपल्या अंगीं आणण्याचा यत्न करणें हेंच त्यांचें स्मारक होय.

**बिपिन चंद्रपाल**—आपल्या मातृभूमीची परकीय नोकरशाहीच्या कचाटींतून सुटका करावी हाच एक त्यांना ध्यास लागला होता. आणि ज्याप्रमाणें चतुर सेनानायक वेळोवेळीं आपल्या शत्रूविरुद्ध कोणतें धोरण यशस्वी होईल हें ठरवून त्याचा स्वीकार करितो त्याप्रमाणें लो. टिळकहि जें धोरण उपयुक्त ठरेल त्याचा त्या वेळीं उपयोग करीत असत. टिळकांच्या मृत्यूनें महाराष्ट्राचें सौभाग्य हरपलें !

**मिसेस बेझंट**—त्यांच्या आयुष्यांतील सर्व चळवळींना व विचारांना स्वदेशभक्ति हीच एक प्रेरक शक्ति होती. त्यांच्या कोणत्याहि चळवळीला स्वार्थपरायणतेचा बिलकुल स्पर्शहि नसे. ते आपल्या मायदेशाकरितांच जगले आणि अखेर आपल्या देशाकरितांच त्यांनीं आपला देह ठेविला.

**मि. अँड्रूज**—टिळक हे श्रेष्ठतम देशभक्त व मुत्सद्दी होते एवढेंच नव्हे तर ते जाडे पंडितहि होते.

**ना. परांजपे**—टिळकांची बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग व देशभक्ति हे गुण त्यांच्या शत्रूसहि कबूल करावे लागतील.

**जम्नादास द्वारकादास**—निष्कलंक पवित्र आचरण, साधी रहाणी, आपल्या देशबांधवांनीं जगांत डोकें काढावें व आपला जन्मसिद्ध हक्क प्राप्त करून घ्यावा याविषयींची कळकळ, देशभक्ती-करितां सोसलेले अपरंपार कष्ट व केलेला स्वार्थत्याग, आणि केव्हांहि निराश न होतां देशहिताकरितां झगडण्याचें सामर्थ्य या गुणसमुच्चयामुळें त्यांच्या नांवांत एक प्रकारची आश्चर्यकारक जादू भरली होती व त्या जादूनें अखिलभरतवासी मोहित होऊन गेले होते.

**कस्तुरीरंग आयंगार**—हिंदुस्थानच्या सांप्रतच्या आणीबाणीच्या प्रसंगीं टिळकांच्यासारखे गुणवत्तर पुरुष नाहींसे होणें ही राष्ट्रीय आपत्तीच होय.

**विजयराघवाचार्य**—देशसेवेच्या उदात्त भावनेशिवाय टिळकांना दुसरी महत्वाकांक्षाच नव्हती. त्यांना सामान्य जनतेच्या भावना व गरजा अचूक समजत. राष्ट्रकार्याकरितां आपला देह अर्पण करावयाचा या निधड्या निश्चयानें व शुद्ध देशभक्तीनें त्यांना देशकार्याची स्फूर्ति मिळाली होती.

**रंगास्वामी आयंगार**—हिंदभूमीच्या अत्यंत अडचणीच्या प्रसंगीं हा अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा मुत्सद्दी हरपला!

**एस. श्रीनिवास आयंगार**—शत्रूंनीं कितीहि छळ केला व वाटेल तशी बदनामी केली तरी टिळकांनीं स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां इतर कोणीहि केली नाहीं अशी कामगिरी केली. त्यांची संघटनाशक्ति, सतत व बिनबोभाट परिश्रम, अडचणीच्या वेळीं चटकन योग्य निर्णय ठरविण्याची हातोटी, आणि राजकीय धोरण

या गुणांची आतां मोठीच वाण भासूं लागेल. तथापि महाराष्ट्राच्या या अनभिषिक्त राजानें जो मोठा संघ तयार केला तो संघ यापुढेंहि एकजुटीनें वागून हिंदभूमीला तिच्या ध्येयाप्रत पोंचवील अशी आशा आहे.

**बाबू अरविंद घोष**—लो. टिळकांनीं आपल्या कर्तबगारीनें ऐतिहासिक व प्रसिद्ध पुरुषांत पहिली रांग पटकाविली आहे. त्यांनीं बिंदूचा सिंधु केला आणि ओबडधोबड सामुग्रींतून स्वराज्याची भव्य इमारत उभारली. त्यांनीं हिंदी लोकांना नवीन, जोमदार, स्वावलंबी, राष्ट्रीय वळण लाविलें आणि त्यांच्या राजकीय आकांक्षा जागृत करून व त्यांच्यापुढें राष्ट्रीय ध्येय ठेवून त्यांच्या मनांत स्वराज्यप्राप्त्यर्थ चळवळ करण्याच्या निश्चयाचें बीजारोपण केलें.

**डॉ. तेजबहादूर सप्रू**—टिळकांच्या स्वभावांतील मुख्य गुण त्यांची कधींहि दबली न जाणारी चिकाटी होय. त्यांचा दुसरा सद्गुण अढळ धैर्य आणि तिसरा निराशाराहित्य हा होय.

**ना. चिंतामणी**—टिळक हे एक व्यक्ति नसून तो एक सांप्रदायच होता. त्या सांप्रदायाच्या प्रसारासाठीं त्यांनीं आपलें सर्व आयुष्य खर्चिलें. त्यांची संघटनाशक्ति आश्चर्यकारक होती. कसलेंहि संकट कोसळलें तरी ते आपल्या ध्येयापासून च्युत झाले नाहींत. बेदरकारी धैर्य, कार्याची चिकाटी, आपत्तींतून डोकें वर काढणें, सार्वजनिक मताचा दडपशाहीनें बींमोड करण्याच्या प्रयत्नाची निष्फलता, स्वातंत्र्यप्राप्तीचा अजिंक्य निश्चय, अपूर्व बुद्धिमत्ता या सर्व गुणांचा टिळक हे असामान्य पुतळा होत असेच भावी पिढ्या समजतील.

रेझा अली—आजमितीला हिंदुस्थानांत स्वातंत्र्याची, बंधुप्रेमाची, राष्ट्रीय स्वाभिमानाची आणि एकीची जी स्फूर्ति उत्पन्न झाली आहे ती टिळकांनीं उत्पन्न केली आहे, आजि जोंपर्यंत या देशांत 'स्वराज्य' हा शब्द उच्चारणारी एक तरी व्यक्ति जिवंत राहील तोंपर्यंत टिळकांचें नांवहि राहील. आपल्या राजकीय चळवळींत त्यांनीं अनुपमेय धैर्य दाखविलें.

रंगा अय्यर—टिळकांच्या मृत्यूनें आपला नेता, तत्ववेत्ता व लोकांचा खरा प्रतिनिधि नाहींसा झाला. टिळक हे कल्पनाप्रचुर आणि व्यवहारचतुर मुत्सद्दी होते. राष्ट्रीय स्वातंत्र्याखेरीज हिंदुस्थान देश जगांत असूननसून सारखाच या भावनेनें लो. टिळकांनींच 'स्वराज्य' हें आपलें ध्येय होय ही गोष्ट हिंदी लोकांच्या अंतःकरणावर बिंबविण्याचे अत्यंत परिश्रम केले. जनतेचें चित्त आकर्षण करून घेण्याची कला त्यांसच साधली होती. आणि हिंदुस्थानच्या भावी उन्नतीची इमारत प्राचीन वैभवाच्या पायावर उभारावयाची ही त्यांची कल्पना अत्यंत समर्पक असून याचसाठीं त्यांनीं शिवाजी व गणपत्युत्सव सुरू केले.

खासेराव जाधव—हिंदुस्थानचे राष्ट्रीय पुढारी व हिंदमातेचे सुपुत्र लो. बाळ गंगाधर टिळक यांस देवाज्ञा झाल्याबद्दल बडोदें येथील मराठा समाजास अत्यंत खेद वाटत आहे. लो. टिळक यांच्या मृत्यूनें देशाचें कधींहि भरून न येण्यासारखें नुकसान झालें आहे.

डॉ. भांडारकर—टिळकांच्या जीवनयात्रेंत त्यांच्यावर जे कष्ट येऊन पडले-त्यांचा शतांश आमचेवर पडला असता तरी आम्ही कोठच्या कोठें गेलों असतों. त्यांच्यासारखीं नाना प्रकारचीं संकटे

भोगून प्रपंचामध्यें तरंगावयाचें ही गोष्ट सामान्य मनुष्यास साध्य नसते. बळवंतराव टिळक यांचा व माझा संशोधनाचा मार्ग एकच असे, यामुळें त्यांचें लिहिणें मला बिचाराई वाटे.

**सर दिनशा एदलजी वाच्छा**—टिळक हे माझे जुने मित्र आणि ३५ वर्षेंपर्यंत सहकारी राष्ट्रकार्यकर्ते होते. सध्याच्या प्रचलित प्रश्नाविषयीं कांहींहि मतभेद असला तरी त्यांची सर्वमान्य बुद्धिमत्ता व महत्त्वाचे शोध यांविषयीं मला अत्यंत आदर वाटत असे. सांप्रतच्या इतर सर्व गोष्टी स्मरणांतून नष्ट झाल्या तरी त्यांचे दोन अद्भुत ग्रंथ हे त्यांच्या बुद्धिप्रकर्षाचें अढळ स्मारक म्हणून जगांत राहतील. त्यांची चिकाटी, धैर्य, साधी रहाणी यांच्या योगानें ते एक अद्वितीय पुढारी होऊन गेले.

**लाला लजपतराय**—टिळकांच्या मृत्यूनें हिंदुस्थानांतला अव्वल तीचा देशभक्त आणि अर्वाचीन हिंदुस्थानाचा एक स्फूर्तिदाता नाहींसा झाला. आपल्याराजकीय वातावरणाच्या सांप्रतच्या परिस्थितींत यापेक्षां घोरतर आपत्ति दुसरी कोणती असणार!

**ल. ब. भोपटकर**—विख्यात राजकीय पुढारी होण्याला जे जे गुण लागतात ते ते सर्व गुण टिळकांच्या अंगीं एकवटले होते. त्यानीं महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत राष्ट्रीयत्वाची ज्योत पेटविली. एवढेंच नव्हे तर तिचा प्रकाश इतर प्रांतांतहि त्यांनीं पोंचविला. सतराव्या शतकांत रामदासांनीं जी राष्ट्रजागृतीची कामगिरी केली तीच टिळकांनीं या शतकांत केली. त्यांच्या तोडीचा पुढारी हिंदुस्थानांतच काय पण पाश्चात्य देशांतहि सांपडणें कठिण.

**ना. खापर्डे**—टिळकांच्या सर्वगामी बुद्धीला उपमा विद्यारण्यस्वामींचीच साजेल. राजकारणांत ते सर्वस्वीं डेमोक्रॅटिक ( लोकसत्ता-

वादी ) होते. यामुळेंच ते सरकारच्या रोषाला पात्र झाले व त्यांस तुरुंगवास भोगवा लागला. ही आपत्ति त्यांनीं अत्यंत धैर्यानें सहन केली व तुरुंगवासांत त्यांनीं विचारांत क्रांति घडवून आणणारे ग्रंथ लिहिले. हिंदुधर्मांतील तत्त्वें चिरकाल टिकणारीं आहेत असें त्यांस वाटत असल्यामुळें ते पाश्चात्य पद्धतीवर समाजसुधारणा करण्याला विरोध करीत. यामुळें ते सुधारणाद्वेष्टे आहेत असा कित्येकांचा समज झाला आहे. पण टिळकांचें मतच खरें असें प्रत्ययास येईल व त्यापासून हिंदुस्थानाचेंच नव्हे तर जगताचेंहि कल्याण होईल.

**स्वामी श्रद्धानंद**—हल्लींच्या संकटप्रसंगीं टिळकांच्या मृत्यूमुळें आबालवृद्ध शोकाकुल झाले असून मला तर हा प्रसंग वज्रघाताप्रमाणेंच वाटतो. लोकमान्यांचा संघटित पक्ष हाच खरा राष्ट्रीय पक्ष असून तो स्वयंपूर्ण व वीर्यवान आहे.

**मि. सत्यमूर्ति**—हिंदुस्थानांत राष्ट्रीय भावना उत्पन्न करण्याचें श्रेय इतर कोणापेक्षांहि टिळकांनाच अधिक आहे. टिळकांनीं हिंदुस्थानचीच नव्हे तर सर्व मानवजातीची योग्यता वाढविली. आम्ही जर त्यांचे खरे अनुयायी असूं तर स्वराज्यप्राप्तीचे आपले प्रयत्न दुप्पट जोरानें चालविले पाहिजेत.

**श्रीनिवास व्यंकटेश कौजलगी**—लोकमान्यांच्या तोडीचा खरा कर्मवीर दुसरा सांपडणें कठीण आहे. त्यांची जागा भरून निघणें त्याहूनहि कठीण आहे ! असें जरी आहे तरी नुसता शोक करीत बसणें त्यांच्या खऱ्या भक्तांना शोभावयाचें नाहीं. लोकमान्यांच्या जिवाला जीवंतपणीं ज्या ध्येयाची तळमळ अहोरात्र लागून राहिली होती, त्या ध्येयाच्या प्राप्तीकरितां प्रत्येक टिळकभक्तानीं कंबर बांधली पाहिजे व आपलें तनमनधन या कामीं खर्चीं घाल-

ण्याच्या संकल्पाचें उदक सोडून स्वार्थाला तिलांजली दिली पाहिजे. यानेंच लोकमान्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास शांति मिळणार आहे.

**खिलाफत-डेप्युटेशन, पारीस**—पारीसहून खिलाफत-डेप्युटेशनचे पुढारी महंमद अली, सुलैमान नाडवी, अबुल कासम आणि मशीर किडवाई हे तारेनें कळवितात—टिळकांचा अकालिक मृत्यु ही कधींही भरून न येणारी राष्ट्रीय हानि आहे. स्वातंत्र्य-संपादनाकरितां जी किंमत पडेल ती देण्याला आणि आपल्या-ध्येयसिद्धीसाठीं आत्मयज्ञ करण्याला आपण नेहमीं तयारच असलें पाहिजे. हें तत्त्व आम्हांस लोकमान्य टिळकांनीं शिकविलें. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं आणि हिंदुमुसलमानांच्या एकीसाठीं त्यांनीं जो आटोकाट यत्न केला तो तसाच पुढें चालू ठेवण्याला टिळकांच्या उदात्त उदाहरणानें तुम्हांस व तुमच्या सहकारी बांधवांस स्फूर्ति मिळो.

**ना. वेळवी**—लोकमान्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची आम्हांस निरतिशय गरज असतां याच वेळीं निर्घृणकाळानें त्यास ओढून नेलें. लोकमान्यांच्या अभावी सुकाणू विरहित नौकेची वादळांत जशी स्थिति होते तशी राष्ट्रीय पक्षाची स्थिति होईल अशी मला धास्ती वाटते.

# दुःखप्रदर्शक ठराव.

डे. ए. सोसायटीचें बोर्ड—रा. टिळक यांच्या निधनाबद्दल या बोर्डास अतिशय दुःख होत आहे ही गोष्ट नमूद करण्यांत येत आहे. टिळक हे न्यू इंग्लिश स्कूलच्या संस्थापकांपैकीं एक असून सहा वर्षेपर्यंत ते या सोसायटीचे लाइफ-मेंबर होते. त्यांच्या मृत्यूमुळें, विशेषतः हल्लींच्या आणीबाणीच्या प्रसंगीं, देशाचें अपरिमित नुकसान झालें आहे.

न्यू इंग्लिश स्कूल—न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यांचे एक आद्य संस्थापक व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक मूळचे लाइफ-मेंबर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या निधनामुळें आम्ही या सभेंत जमलेले न्यू इंग्लिश स्कूलमधील सर्व लाइफ-मेंबर, शिक्षक व विद्यार्थी अत्यंत दुःखी झालों आहोंत. लोकशिक्षणार्थ स्वार्थत्यागाचे तत्त्वावर न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करून त्यांनीं आम्हांस व महाराष्ट्रास अत्यंत ऋणी करून ठेवलें आहे. त्यांनीं स्वार्थत्याग, राष्ट्रप्रेम व धैर्य या गुणांनीं सर्व लहानथोरांच्या अंतःकरणांत उच्च भावनांचें बीजारोपण केलें.

फर्ग्युसन कॉलेज—फर्ग्युसन कॉलेजांतील शिक्षक व विद्यार्थी यांना रा. टिळकांच्या निधनामुळें परमावधीचें दुःख होतें रा. टिळक हे न्यू इंग्लिश स्कूलचे एक आद्य संस्थापक असून त्या शाळेचाच फर्ग्युसन कॉलेज व डेक्कन एज्युकेशन सोसायटी हा विस्तार होय. त्यांची अगाध बुधिमत्ता, स्वार्थत्याग आणि देशभक्ति या

गुणांचा त्यांच्या देशबांधवांच्या मनावर कायमचा ठसा उमटला असून त्यामुळें त्यांना त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि वाटत आहे.

**डेकन सभा**—रा. टिळक यांच्या मृत्यूनें डेक्कन सभेला अतिशय खेद वाटत आहे. कांहीं सार्वजनिक प्रश्नांवर या सभेचा त्यांच्याशीं मतभेद असला तरी अनुकरणीय स्वार्थत्याग करून आणि अतिशय शारीरिक कष्ट सोसून त्यांनीं जी आमरण राष्ट्रसेवा केली तिच्याविषयीं या सभेला आदर वाटत आहे.

**भारत–इतिहास–संशोधक–मंडळ**–' बाळ गंगाधर टिळक ' यांच्या निधनाचें वृत्त वाचून मंडळास पराकाष्ठेचा शोक होत आहे. कै. टिळक हे सर्वमान्य व सर्ववंद्य देशसेवक तर होतेच, परंतु पुराणेतिहाससंशोधक या नात्यानेंहि त्यांची कीर्ति व अधिकार केवळ लोकोत्तर होते. खेरीज महाराष्ट्र इतिहास व सारस्वत यांचे ते कळकळीचे थोर पुरस्कर्ते होते. भा. इ. सं. मंडळाचे ते कट्टे अभिमानी व साहाय्यक असल्यामुळें त्यांचा मंडळास मोठाच अधार होता. त्यांच्या मृत्यूनें सर्व देशाची, संशोधनकार्याची व त्यांतले त्यांत मंडळाची झालेली हानि अभूतपूर्व आहे. या " महापुरुषा "-च्या मृत्यूच्या दुःखसमयांत मंडळ कर्तव्यबुद्धीनें त्यांच्या अप्तेष्टांचे भागीदार आहे.

**मुंबई म्युनिसिपालिटी**—रा. बी. जी. टिळक यांच्या मृत्यूची खेदकारक वार्ता ऐकून या म्युनिसिपालिटीस पराकाष्ठेचें दुःख होत आहे. त्यांचा कळकळीचा व निःस्वार्थी देशाभिमान, अगाध विद्वत्ता, निर्भय मतस्वातंत्र्य आणि मातृभूमीच्या सेवेंत दिसून येणारी त्यांची अविश्रांत भक्ति या गुणांमुळें देशांतील सर्व लोकांना त्यांच्याविषयीं आदर, अभिमान व कौतुक वाटत असे, आणि म्हणूनच

त्यांच्या मृत्यूनें सर्व देशाची हानि झाली आहे. त्यांच्या सन्मानार्थ आज या म्युनिसिपालिटीच्या सभेचा कार्यक्रम बंद ठेवण्यांत यावा.

**पुणें शहर म्युनिसिपालिटीचा ठराव**—रा. बी. जी. टिळक यांच्या दुःखकारक मृत्यूबद्दल पुण्याच्या म्युनिसिपालिटीला अतिशय खेद वाटत आहे. रा. टिळक हे दोन वर्षेंपावेतों या म्युनिसिपालिटीचे सभासद असून पुणें शहराचे व सर्व महाराष्ट्राचे ते मार्गदर्शक असल्यामुळें त्यांच्या मृत्यूमुळें झालेली हानि बरेच वर्षेंपावेतों पुण्यांतील लोकांस भासत राहील. अशा तऱ्हेचा कर्तृत्ववान नागरिक आमच्या शहरास लाभल्यामुळें त्यांजबद्दल आम्हांस अभिमान वाटत असे. ही आमची हानि भरून येणें केव्हांहि शक्य नाहीं. राष्ट्राभिमान व मातृदेशाची निस्सीम भक्ति या दोन गुणांत ते कोणासहि हार जात नसल्यामुळें ते भरतभूमीचे खरे सत्पुत्र होते. त्यांची विद्वत्ता व शोधकबुद्धि पाश्चिमात्य शास्त्रज्ञांस देखील मान्य झाली आहे. देशासाठीं त्यांनीं केलेली कामगिरी ही हिंदुस्थानच्या इतिहासांत नेहमीं चिरस्मरणीय राहील.

**शिक्षणप्रसारक मंडळी, पुणें**—पुण्यांतील सुप्रसिद्ध पुढारी व नागरिक कै० लो० बाळ गंगाधर टिळक यांच्या निधनामुळें शिक्षणप्रसारक मंडळीच्या बोर्ड ऑफ–मेंबरांस परमावधीचें दुःख होत आहे. कै० लो० टिळक यांची अप्रतिम विशाल, व सर्वगामी बुद्धिमत्ता, प्रखर व तेजस्वी देशाभिमान, अचाट श्रमसहिष्णुता व कष्टाळूपणा, अपूर्व स्वार्थत्याग, अलोट धैर्य, पराकाष्ठेचा करारीपणा, अगाध विद्वत्ता इत्यादि अनेक लोकोत्तर गुण व या सर्वांहून विशेष म्हणजे या गुणांचे योगें त्यांनीं केलेली अखंड, अकृत्रिम व एकनिष्ठ देशसेवा व त्यायोगें घडवून आणलेली प्रचंड लोक-

जागृति यांचें अवीट स्मरण त्यांचे देशबांधव दीर्घकाल कौतुकानें व आदरानें स्वोन्नत्यर्थ व देशहितार्थ करीत राहतील.

आमचें नूतन मराठी विद्यालय सन १८८३ त ज्यांनीं स्थापन केलें त्यांना कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर व टिळकप्रभृतींचेंच उज्ज्वल उदाहरण कारणीभूत झालेलें होतें. कै० टिळक यांचा या ऋणानुबंधामुळें शाळेवर व मंडळीवर लोभ असे; व ज्यावेळीं मंडळीनें न्यू पूना कॉलेज काढलें त्या वेळीं कॉलेजसाठीं शहराजवळ कै० बाबामहाराज यांच्या बागेंतील नमुनेदार जागा मंडळीस मिळवून देण्याचे कामीं कै. लो. टिळक यांचेंच प्रेम व श्रम कारण झाले आहेत. याबद्दल त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण राखणें हें मंडळीचें कर्तव्य आहे, असें मंडळीस वाटतें.

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय
अ.क्र. 3313
वाई जि. सातारा

# लोकमान्यांच्या निधनाबद्दल भरलेल्या शीलोन्नति समाजाच्या दुखवट्याच्या सभेंत वाचलेल्या कविता.

## बाष्पांजलि.

### ( लोकमान्यांविषयीं शोकालाप. )

पृथ्वी.

कडाड करिती विजा, जणुं भ्रचक्र खालीं पडे ! ।
तिरीप चमके ! क्षणीं झडति काळजाचे सडे ! ॥
क्षणीं प्रळयकालिंचें उसळलें गमे वादळ ! ।
तयांत जग सांपडे जणुं सुके तरूचें दल ! ॥ १ ॥
पडेल उपडा—असें गमत—रोदसीचा डबा ! ।
जणों प्रलयरुद्र हा खवळुनीच ठाके उभा ! ॥
बनाव पुढल्या क्षणीं कवण ! ईश्वरा दाविशी ! ।
सचिंत जनता मनःस्थिती भयार्त होती अशी ! ॥ २ ॥
नभामधुनि तों कुणी ज्वलित दिव्य तारा गळे ! ॥
तुटोनि रविबिंब वा जणुं महीवरी आदळे ! ॥
असेंच परवां घडे ! —टिळक, राष्ट्र भू तन्मणी ! ।
अकल्पित गळे हिरा !! अहह !!! राष्ट्रवीराग्रणी ! ॥ ३ ॥

शिखरिणी.

तुझा हिंदुस्थाना ! खचित पुशिला मंगलटिळा ! ।
महाराष्ट्रा ! आशांकुर, अधम काळें उपटिला ! ॥

करंटा तूं ! तूझें नाशिव फुटलें ! ! हा ! कटकटा ! ! ।
कृतांता ! चांडाळा ! हरिसि कलिजा ! रे हलकटा ! ॥ ४ ॥
अहा ! आकाशाशीं झगमग करी सूर्य झुकता ! ।
कसा अस्ता गेला ! तिमिर पसरूनी न कळतां ! ॥
अतां आनंदानें फुगातिल वडे वृद्ध घुवडे ! ।
वृकव्याघ्रां स्वैरें भ्रमण करण्या दैव उघडे ॥ ५ ॥

रिती मांडी झाली भरतमहिची बाळतिलका ! ।
जरा पाठीमागें वळ, बघ, तिच्या गल्ल–फलकां ! ॥
" कृमी ऐशीं पोरें अगणिक वियालें ! परि मुला ! ।
दिवा तूं त्यांमाजी ! " स्मरत रडताहे ढळढळां ! ॥ ६ ॥
महाराष्ट्रास्त्रीच्या ठळक तिलका ! तीस विधवा– ।
करूनी गेलासी ! परि बघ, कसा तापुनि तवा ॥
फुटाणेसे सारे जन निघति भाजूनि विरहीं ! ।
न कोणी त्या वाली ! रडुनि भिजवीती बघ मही ! ॥ ७ ॥

भुकेनें पोटाची हरहर ! जहालीच उखळी ! ।
अशीं येतां जातां दिसति किति मार्गांत दुबळीं ! ॥
अहा ! काळा तीं तूं तळमळत टाकूनि पळसी ! ।
मणी भूदेवीच्या गळसरींतलें मात्र हरिसी ! ॥ ८ ॥

शार्दूलविक्रीडित.

झाला राष्ट्रीय पक्ष, बाळतिलका ! कीं पोरकें पोरसा ।
हिंदुस्थानहि हाललें ! बघ कशी ही कांपताहे रसा ! ॥
वा, थांबीव तुझें विमान भवतीं दृष्टी जरा फेंकरे ! ।
राष्ट्राच्या विपिनांत हंबरति हीं पाहा तुझीं वांसरें ॥ ९ ॥

आतां मंजुळ वाजवूनि मुरली राष्ट्रींय हीं वासरें ।
गोळा कोण करूनि नाचविल कीं पुच्छें उभारून रे !
राष्ट्रांतलि समस्त बंधु भगिनी वृद्धांध बालां मुलां ।
होते कीं बहु दुःख आठवुनियां रे बाळकृष्णा ! तुला ॥१०॥

स्रग्धरा.

काठी ही आंधळ्यांची अवचित हरिली कां कृतांताधमा ! रे ।
राष्ट्राचा प्राण तो तूं अचुक निवडिला ! काय केलें तुवां रे
आम्हां पाहूनि अंधा हृदय तडकतें निश्चयें फत्तराचें ॥
नष्ट ! दुष्टा ! कठोरा ! तव परि हृदया नांव ना पाझराचें ! ११

आर्या.

वा ! लोकमान्यतिलका ! दरवळल्या घ्राणतर्पणामोदें ॥
नंदनवनांत गाणीं गात करीं कीं विहार तूं मोदें ! ॥ १२ ।

पेडणें—गोवा.
ता. ४–८–२०

शोकदग्ध,
दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

---

## तिलकवियोग !

श्लोक

आशा मावळली उमेद खचली बोथाटली ले
लागे दांतखिळी न भान जवळी दृष्टी भरे
नाडी बंद पडे, जणों चहुकडे अंधार झाला
जेव्हां श्रीबलवंतराय तिलक स्वर्गास गेला गुणी ॥ १ ॥

राष्ट्राचा जणुं तूं पिता तुजविणें आम्ही मुलें पोरकीं ॥
कोणाच्या निरवोनिया करिं आम्हां जातोसि तूं सांग कीं ॥
सांभाळील अम्हांस कोण सदया ! दे धैर्य चित्ताप्रति ॥
हा हा काय असा प्रसंग विधिनें हां आणिला संप्रति ॥ २ ॥

रे काळा ! अधमा । हवे जर तुला खायास कांहीं तरी ॥
होते काय कमी अम्हांसम कृमी जे भार भूमीवरी ॥
देशाचा अवघ्या अचानक तुवां आमा कसा ग्रासिला ॥
सारासार विचार अल्पही कसा नाहीं मनीं पातला ॥ ३ ॥

ज्यानें भूक तहानही न गणुनी चाळीस वर्षे अहा ॥
देशाच्याची हितार्थ वाक्तनुमनें केली तपस्या महा ॥
तो भीष्मासम धीर, वीर, कुशल श्रीकृष्णसा प्रेमळ ॥
गेला बाळ तईं बुडेल न कसे शोकार्णवीं भूतल ॥ ४ ॥

हा सारा परि वेग आवरुनि हे मद्देशबंधु ! क्षण ॥
राष्ट्राची स्थिति या पहा उघडुनी आतां त्वरें लोचन ॥
ेती पक्ष अनेक, निर्णय नसे, बुद्धी जणों चावळे ॥
हेरुनि असंख्य लोक टपती जैसे व्रणा कावळे ॥ ॥ ५ ॥

वेळीं दुसरा उपाय कसला एकी करा सत्वर, ॥
ावा अज्ञजनांस मार्ग बरवा चित्तीं वसो आदर ॥
ीर्घोद्योग करोनि पुण्यपुरुषे त्या मार्ग जो आंखला ॥
ाला तोच तरीच लौकिक तुम्ही त्याचा खरा राखला ॥६॥

कानें गळल्यास पाय पुढती झालों म्हणा पांगळें ॥
ाशीं भिडला कृतांत अजुनि नेणों कसें चांगलें ॥
ाधांव करा तरीच टिळकां आनंद वाटे महा ॥
नाहीं हें घडल्या सदा तळमळे स्वर्गी तदात्मा पहा ॥ ७ ॥

कर्मे आचारेतो स्मरोनि हरिला लाभे जयश्री तया ॥
आल्या संकट त्यांतुनीहि अपुल्या चित्तांत भी कासया ॥
नेता योग्य मिळेल तैं न जनता पाहील देहाकडे ॥
कोण्याही परि नायका न दुखवी साहाय्य दे रोकडे ॥ ८ ॥

लोकमान्य बलवंत दयाळा ।
नित्य वंदन तुला शत वेळां ॥
अंत्यदर्शन तुझें मज नाहीं ।
पावते म्हणुनि हे तनु लाही ॥ ९ ॥

—मुकुंदराय.

---

## टिळक-निधन-संशय-रत्नमाला.

जनहितरत भगवन्ता, गुणवन्ता, राष्ट्रवीर बलवन्ता,
गेलास सांग कैसा लोटुनि दुःखांत दीन ही जनता? ॥ १
कीं त्या शचीवरानें देवांचा माण्डिला अनन्य छल।
स्वातंत्र्यार्थ तयांच्या धावुनि गेलास तूं न हें नवल ? ॥ २
किंवा भारतभूचा हेवा लक्ष्मीस फार वाटोनि ।
नेला बळें तिचा कीं श्रीनें हा चन्द्रहार काढोनि ? ॥ ३ ॥
कीं हा अशक्य झाला विश्वाचा कुसुमहार ईशाला ।
अन्ती कुशल मिळेना म्हणुनिच कां तेथ नेमिलें तुजल
तत्वज्ञान विसरला कृष्णहि घडतां च वास स्वर्गाचा, ।
गेलास काय म्हणुनी सांगाया पाठ त्यास गीतेचा ॥ ५

किंवा पुनरपि झाला इन्द्रा ! संग्राम दैवदैत्यांचा ? ।
नेळा करावया तह मुत्सद्दी तिलक काय हा आमुचा ! ॥ ६ ॥
किंवा गोपाळादी गेले प्रतिपक्षि जे तुझे त्यांनीं—
पुनरपि युद्ध कराया नेलें तुज तेथें काय बोलवुनी ! ॥ ७ ॥
किंवा अण्णा गेलें, गेले नवरोजि सोडुनी तुजला ।
विरहचि असह्य झाला म्हणुनी इहलोक हा तुवां त्याजिला ? ॥ ८ ॥
पंजाबांत अमानुष किंवा सदया ! प्रकार जो घडला ? ।
सात्विक काय म्हणावा त्वां हा त्याचा निषेध दाखविला ? ॥ ९ ॥
ब्राह्मण-अब्राह्मण हा आम्हीं जो शुष्क वाद माजविला ।
वेळ अवेळ न बघतां, म्हणुनी कां राग आमुचा आला ? ॥ १० ॥
किंवा तंव तेजस्वी अनुसरतां ये न मार्ग आम्हांला ।
त्या योगें बलवन्ता ! वद कां नैराश्य वाटलें तुजला ? ॥ ११ ॥
कीं लाभली तुला नच पलही संवत्सरांत चाळीस—
विश्रांति; म्हणुनि अक्षय-शान्तीचा वास काय केलास ? ॥ १२ ॥
कीं वाटलें तुला बा ! अवघें अवतारकृत्य तंव झालें ?
परि या स्थितींत आम्हां सोडुनि तुज केवि सांग जाववलें ? ॥ १३ ॥
यापरि अनंत शंका एकामागूनि एक जरि येती ।
युक्ताचि न दिसे एकहि भारतप्रेमापुढें तुझ्या तरि ती ॥ १४ ॥
गेलास काय याया पुनरपि विश्रांति अल्प घेवोनी,
हें—हेंच—योग्य दिसतें कारण तुज सोडण्यास ही अवनी ! ॥ १५ ॥
तरि मग वद परतोनी केव्हां येशील येथ बलवन्ता !
पल एक एक वाटे वर्षासम, करि विलंब नच आतां ! ॥ १६ ॥

गणेश रामचंद्र करंबेळकर.

---

१ गोपालादि—गो. कृ. गोखले, आगरकर, इ. इ.
२ अण्णा—अण्णासाहेब पटवर्धन.

3313/च
92082